
E-BOOK
'तुम मुझे यूँ.. भूला न पाओगे..!'
मोहम्मद रफी
लेखक - डॉ. अनंत पावसकर

‘ई-साहित्य प्रतिष्ठान’
सादर करीत आहे.
डॉ. अनंत पावसकर लिखित
‘तुम मुझे यूँ.. भूला न पाओगे..!’-
महान गायक : ‘मोहम्मद रफी’

© - डॉ. अनंत पावसकर (ज्येष्ठ पत्रकार व संगीत संयोजक)
anantpavaskar@gmail.com ९८२००२२४१७

हजारो दर्जेदार मराठी ई-पुस्तके!
फक्त ‘एकच’ क्लिक ..... आणि ई-पुस्तक हजर
For all ‘E-Sahitya’ E-Books.. Visit/Log on
https://www.esahity.com
(पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर एक क्लिक करा-
एक मिनिट थांबा- बस्स)
तुमच्या आवडीची पन्नास पुस्तके डाऊनलोड करून मोबाईलवर ठेवा.

आरामात वाचा!, लोकांनाही फॉरवर्डा. चकटफू !

‘तुम मुझे यूँ.. भूला न पाओगे..!’-

महान गायक : ‘मोहम्मद रफी’

लेखक : डॉ. अनंत पावसकर

प्रकाशन : ३१ जुलै, २०२६

© esahity Pratishthan®2026

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com esahity@gmail.com

ई साहित्य प्रतिष्ठान : Whatsapp - 9987737237

(फ्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ‘ई-पुस्तक’ वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ‘ई-साहित्य’ प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author’s copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

‘तुम मुझे यूँ.. :‘मोहम्मद रफी’ ♥ © डॉ.अनंत पावसकर

लक्षात घ्या.. हे बोलकं 'ई-बुक' आहे. या 'ई-बुक' मधील प्रत्येक 'फोटो'वर 'लिंक्स्' दिल्या आहेत, तसेच प्रत्येक निळ्या रंगातील मजकुर, यावर सुद्धा संबंधित 'लिंक्स्' दिलेल्या आहेत. फक्त 'क्लिक' करा, आणि मनसोक्त आनंद घ्या.

♥ लेखकाविषयी थोडेसे : ♥

डॉ. अनंत पावसकर, (ज्येष्ठ सिने पत्रकार व माजी ध्वनिमुद्रण अधिकारी VENUS) (जन्म. १२ नोव्हेंबर १९५९ मुंबई)

डॉ. अनंत पावसकर, हे खऱ्या अर्थाने हिंदी-मराठी गाण्यांमध्ये आकंठ बुडालेले व्यक्तिमत्त्व. ज्यावेळी एखाद्या गाण्याचे, त्याच्या शब्दसुरांचे, संगीताचे, गायकीचे, गाण्याच्या पार्श्वभूमीचे, ध्वनिमुद्रणाचे, गायक-गायिकांच्या व्यक्तिमत्त्वाचे त्यांना भावलेले सौंदर्य ते उलगडून दाखवतात त्यावेळी त्या गाण्यात दडलेल्या सौंदर्याच्या अनुभूतीचा आस्वाद रसिकांनाही नव्याने भावतो. १९९४ ते २०००.. प्रत्येक शनिवारी (सलग सात वर्षे) दै. सामनाच्या "फुलोरा" पुरवणीमधील "आठवणीतली गाणी" या लोकप्रिय सदरामुळे वाचकांच्या परिचयाचं एक नाव1 आज दिनांक, साप्ताहिक श्री, वृत्तमानस, लोकप्रभा, उत्सव पुरवणी अशा अनेक वृत्तपत्रे, साप्ताहिकात संगीत विषयक लिखाण करणारे डॉ. अनंत पावसकर

हे "व्हीनस" या मातब्बर म्युझिक कंपनीत अनेक वर्षे ध्वनिमुद्रण अधिकारी म्हणून कार्यरत होते. या काळात कंपनीतर्फे व कंपनीच्या शेकडो अल्बममध्ये त्यांचा पर्यवेक्षक म्हणून सहभाग राहिला आहे. कंपनीच्या त्या अद्ययावत स्टुडिओत विविध निर्मात्यांच्या व संगीतकारांच्या शेकडो हिंदी चित्रपटाची गाणी, पार्श्वसंगीत होताना पाहायचं भाग्य लाभलं, परिचय झाला हे विशेष! ज्येष्ठ वादक, संयोजक यांच्यासोबत गप्पाच्या ओघात एकेक गाण्याची आठवण दृग्गोचर होऊ लागताच, यातूनच ते "आठवणीतली गाणी" हे सदर लिहायला उद्‌युक्त झाले. (सन्मा. बाळासाहेब ठाकरे यांच्या निवासस्थानी पुस्तकांचे प्रकाशन झाले व अनेक वृत्तवाहिन्यांनी त्याची दखल घेतली होती.) आपल्या कव्हर स्टोरींसाठी ते ज्येष्ठ गायक, गायिका यांना प्रत्यक्ष भेटून मुलाखती घेत असत. सुमारे चौदा वर्षे संगीतक्षेत्रापासून दूर असणा-या सुमनताई कल्याणपूर यांची मुलाखत घेत "ते सूर ऐकता" (संगीत : शांक-नील) द्वारे त्यांना संगीत क्षेत्रात पुन्हा एकदा लाईम-लाईट मध्ये आणण्याचं श्रेय त्यांच्याकडे जातं. (कवि प्रा. प्रवीण दवणे यांच्याकडे खूप आठवणी आहेत). इतर अनेक दिवाळी अंकात संगीतविषयक लिखाण करताना, ऑडिओ कॅसेट स्वरूपातही दिवाळी अंक असावा.. ही संकल्पना "गुलमोहर" नावाने प्रत्यक्षात आली. (निवेदन प्रदीपजी भिडे). व्हीनसतर्फे अनेक

मराठी नाटके प्रथम व्हीसीडीवर आणण्याचं श्रेय डॉ. अनंत पावसकरांकडे जातं. यात विजय कदम, विनय लाड, सविता मालपेकर, प्रशांत दामले या बालमित्रांची विशेष मदत झाली होती. साईबाबांच्या शिर्डीत १९९९ पासून २००७ पर्यंत ऑडिओ, व्हिडिओ असे सुमारे २५० अल्बम्स बनविण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. हे अल्बम आजही सुप्रसिद्ध आहेत. मराठीतील पहिलं "ई-बुक" बनविण्याचा मान त्यांच्याकडे जातो. यासाठी त्यांना ज्येष्ठ साहित्यिक शिरीष कणेकरजी यांच्या उपस्थितीत यासाठी "आशीर्वाद" पुरस्काराने गौरविण्यात आले होते. तसेच नुकतेच त्यांना आंतरराष्ट्रीय पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. "डॉक्टरेट" सुद्धा मिळाली! आज त्यांची आठवणीतली गाणी, आपली आवड, लिजेंडस् ७७७७, कराओके क्लब यासह इतर अनेक ई-बुक्स "ई- साहित्य" तर्फे सध्या सर्वत्र व्हायरल होत आहेत हे विशेष. आज आपल्या समाधानी निवृत्त जीवनात ते "म्युझिक प्लॅनेट" ही त्यांची स्वतःची संगीत अकादमी समर्थपणे सांभाळत आहेत. आपल्यासारखाच एक सर्वसामान्य रसिक, आपल्या संगीताचं वेड लेखनातून तसेच विविध संकल्पना राबवून लोकांपुढे आणायची सतत धडपड करतो म्हणून हा उल्लेख.

डॉ. अनंत पावसकर यांना हार्दिक शुभेच्छा.

(#संजीव_वेलणकर पुणे. - ९४२२३०१७३३)

♥

'तुम मुझे यूँ.. :'मोहम्मद रफी' ♥ © डॉ.अनंत पावसकर

माझे मनोगत

नमस्कार मित्रांनो.. "माझे मनोगत" म्हणून मी काही खास गोष्टी तुमच्या सोबत शेअर करतोय. "ई-साहित्य प्रतिष्ठान" या "उदयोन्मुख लेखकांसाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या संस्थेचे कार्य खरोखरच अतुलनीय आहे. आज आपली पुस्तके "छापील" स्वरूपात प्रकाशित करणे ही बाब माझ्यासह अनेक लेखकांना अतिशय कठीण गोष्ट झाली आहे. प्रकाशक, नामवंत लेखकांची "पुस्तके" छापतात, प्रकाशित करतात! परंतु यामध्ये नवख्या लेखकांचे काय? कारण अमुक प्रकाशक.. त्या लेखकाला, त्याच्या कलाकृतीसाठी "मानधन" देणे तर दूरच! छपाईचा खर्च सुद्धा मागतात, हे अनेकांनी अनुभवले आहे. यात प्रकाशकांचा अजिबात दोष नाही. छपाईसाठी लागणारा कागद, छपाई आणि नंतर वितरण या गोष्टी अतिशय महागल्या आहेत, हे आपण जाणताच! आज, उद्या "ई-बुक्स" हेच माध्यम असणार आहे, ही काळाची गरज आहे! हे "ई साहित्य प्रतिष्ठान" यांनी ओळखले, याचे सर्व श्रेय सन्मा. "श्री. सुनीळ सामंत" यांना नक्कीच आहे! मित्रांनो, यातून या "ई साहित्य प्रतिष्ठानला" कोणतीही "आर्थिक

कमाई" नसते. केवळ "साहित्य सेवा" हेच त्यांचे उद्दिष्ट्य! सलाम त्यांच्या कर्तृत्वाला!

असो! माझे स्वतःचे असे हे २७ वे "ई-बुक"! आणि मी "निर्मित" केलेली इतर आठ "ई-बुक" पाहता, हे "पस्तीसावे" ई-बुक! धनंजय कुलकर्णी आणि दिलीप ठाकूर या दिग्गज लेखकांची "ई बुक्स"! "संपादन/ले-आऊट करताना मनस्वी आनंद झाला, हे विशेष! "मोहम्मद रफी" यांच्यावरील हे खास "ई -बुक" तुम्हा रसिकांसाठी सादर करत आहे. यात माझ्या स्वतःच्या भावभावना व्यक्त करताना, मो. रफी यांच्याबद्दलच्या सर्वांच्या सर्व "ऑडिओ/व्हिडिओ-लिंक्स" देतोय! रफीसाहेबांवर अनेक पुस्तके आहेत, मात्र माझे परिश्रमपूर्वक बनविलेले हे "ई बुक" तुम्हाला खचितच एका "संदर्भ ग्रंथाएवढा" आनंद देईल. दिपून जा! रमून जा!
धन्यवाद मित्रांनो!
डॉ. अनंत पावसकर.
(ज्येष्ठ लेखक, पत्रकार आणि सिनेसंगीत अभ्यासक)

♥

मोहम्मद रफी! "अमर्याद पुरुषोत्तम!" अलौकिक अनुभूतीचं एक "लौकिक" नाव! मोहम्मद रफी! आपण जगत असलेल्या त्या विसाव्या शतकातल्या सर्व पुरुष गायकातला तो एक "अमर्याद पुरुषोत्तम!" त्यांच्या गळ्याला "मर्यादा" हा शब्दच ठाऊक नव्हता! "क्लासिकल ते गीत, गीत ते गझल, गझल ते कव्वाली. कव्वाली ते विनोदी गाणी, विनोदी गाणी ते भावगीते, कोळीगीते

आणखी बरंच काही! अगदी सहज सादरीकरण! त्याच्या निधनानंतर अनेक जण "त्याचा आवाज आहोत" असे छातीठोकपणे सांगत आले! पण त्यांना संगीत रसिकांनी तंबू गुंडाळून पळ काढायला लावलं! रसिकांच्या हृदयावर, चित्रपट - सृष्टीच्या आसमंतावर सुवर्णाक्षरांनी कोरल्या गेलेल्या लाडक्या "रफीसाहेबांच्या" आठवणींचा हा "गुलदस्ता" - त्यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ!

"हे बघ अब्दुलमियाँ.. हे "वीस" रुपये घे.. आणि तडक "चोरबाजारात" जा..! मला "फौजी" लोकांचे असतात तश्या प्रकारच्या चार-पाच बुटांचे जोड लगेचच हवे आहेत.. ते आण! ज्यादा सवाल मत करना.. जैसे भी मिले.. वो लेकर स्टुडिओ में जल्दी आ जाओ..!" अब्दुलमियाँ तर चक्क "कन्फ्युजलेला!" बडे भैय्या "हमीदभाई" काहीच बोलत नाहीत म्हणता.. पडत्या फळाची आज्ञा शिरसावंद्य मनात तो तडक निघाला! त्यांच्या "भेंडीबाजार" इलक्यापासून "चोरबाजार" काही फार दूर नव्हता! तो निघाला! काम फत्ते करून स्टुडिओला लवकरात लवकर पोहोचायचं हेच मुख्य "टार्गेट" होतं!

तो तरुण निश्चिंत मनाने, मोठे भाऊ "हमीदभाई" यांच्यासह स्टुडिओमध्ये पोहोचला. स्टुडिओमध्ये वादकांची ती गर्दी बघून, तो भांबावलेला! नौशादजींनी त्याचं स्वागत करत बसायला सांगितलं. नंतर क्षणार्धात संगीतकार "नौशादजी" शांतपणे आपल्या संगीत संयोजक आणि वादकांकडे वळले. रेकॉर्डिंग रूमच्या बाहेरच्या त्या चिंचोळ्या जागेतल्या बाकड्यावर तो बिचारा पोरगेलासा तरुण स्वतःच्या परेशानीत आपली नखं कुडतरत बसलेला! "अब्दुलची" वाट बघत! "गाणं रेकॉर्ड होणार आहे ना? मग बुटांचा काय संबंध?" हेच बुचकळ्यात टाकणारं होतं! कोवळ्या वयातील त्या छोकऱ्याला ते सगळं भयंकर वाटणे स्वाभाविक होते! एकीकडे स्टुडिओ बाहेरच्या लॉबीमध्ये.. ते कुणी सुप्रसिद्ध असलेले गायक "श्याम" आणि "अल्लाउद्दीन" यांच्या गप्पांना ऊत आला होता!

मोठे "भाऊ" हमीदभाई.. स्वतःच्या परेशानीत "शतपावली" करण्यात मग्न! तर तो पोरगेलासा तरुण

भयंकर धास्तावलेला. दिलखुलास स्वभावाचे थोर संगीतकार (ही खूप मोठी व्यक्ती असूनही..) "नौशादजी"

मधून मधून त्यांच्याकडे "डोकावत" त्यांना भेटून जात ख्याली-खुशाली (चहापान वगैरेसह) विचारत होते, हाच एक त्यांना मोठा दिलासा होता!

थोरल्या हमीदभाईंची ती "शतपावली".. एखाद्या हॉस्पिटलमधील.. "मॅटर्निटी" रूम बाहेरील.. एखाद्या "बाप होऊ घातलेल्या" तरुणाची असते ना! त्याहून वेगळी नव्हती! शेवटी एकदाचा तो "अब्दुलमियाँ" आला... त्याने ते पार्सल त्याने "श्यामभाई" कडे सोपवले. या कृतीने हमीदभाई आणि ते तरुण, दोघेही सुखावले. "श्यामभाईने" हातातली जळती सिगरेट पायाखाली त्वरेने चिरडून

टाकत, तो सर्वांना इशारा करत "म्युझिक हॉल" मध्ये दाखल झाला. नौशादजींच्या इशाऱ्यासरशी त्या दोघांनी "बूट" घातले. तो बाकड्यावर बसलेला तरुणही पुढे सरसावला. तिघांचे "बूट" घालून होताच.. "रिहर्सल" सुरू झाली. त्यांना माईकसमोर उभं केलं गेलं. त्या तरुणाचं.. अर्थात "मोहम्मद रफी" यांचं "पहिलं चित्रपट गीत" हे रेकॉर्ड होणार होतं. इकडे ज्येष्ठ बंधू "हमीदभाईंनी" नकळत समाधानाचा एक सुस्कारा सोडला. पावसात कडक झालेले, प्रत्येकी चारेक किलो वजनाचे ते चामड्याच्या "बुटांचे" जोड! भयंकर परिस्थिती! बूट काहीसे मोठे असल्याने त्यांनी "रुमाल" वा तत्सम "पॅडिंग" टाकून पाय त्यात जवळजवळ कोंबलेलेच म्हणा ना! नौशाजींनी दिलेला "सायलेन्स.. टेक!!" असा "सिग्नल" मिळताच.. संगीत संयोजक, वादक सरसावून बसले. "रिहर्सल्स" सुरू झाल्या. त्या काळी "ध्वनिमुद्रण" तंत्र विकसित झाले नसल्याने, "फौजी सैनिकांवर" चित्रित

होणारं ते गाणं बुटांचा "खाडखाड" आवाज करतच गायचं होतं. तिघातल्या एकाने जरी बुटांचा आवाज वाढवला तर.. पुन्हा तालीम! तब्बल पंधरा वेळा तालीम केल्यानंतर, गाणं "टेक" करायला घेतलं. इथेही दोन-तीन "रिटेक्स" झालेच! सुमारे "आठ-नऊ किलोमीटर" चालावे इतक्या वेळा पायावर जोर देत बुटांचा आवाज करावा, हे खायचं काम नाही महाराजा! यामुळेच तिघांचे पाय सुजणे, हे स्वाभाविक होतं. तिघेही वैतागलेले! कुरबुर सुरू होती! पण पहिलेच गाणे असल्याने "मोहम्मद रफी" चुपचाप दर्द सहन करत राहिले. इथे उल्लेखलेला "श्यामकुमार" (१९१३-१९८०) हा बरकतीतला "गायक-नट" होता बरं! त्याने थोडीशी कुरबुर केली म्हणतात. पण कुणीही त्याकडे लक्ष दिलं नाही, हे विशेष! गाणे गाताना पाय "सुजले"! हे जगातील कदाचित एकमेव उदाहरण असावे! नाही का!? "हिंदोस्ता के हम है, हिंदोस्ता हमारा, हिंदू मुस्लिम दोनों की आँखों का तारा..." या समूहगीतात एक अख्खं कडवं "मोहम्मद रफी" यांचं

होतं बरं! ("लिंक" नक्की पहा!) या गाण्याच्या निमित्ताने का होईना, "मोहम्मद रफी" यांचा आवाज पहिल्यांदा "रेकॉर्डच्या" तबकडीवर आणि रजतपटावर उमटला. या गाण्याची ही संपूर्ण "कथा" मला दस्तुरखुद्द "नौशादजींनी" अगदी आपलेपणाने सांगितली होती, हे विशेष!

आपल्या लाडक्या "रफी साहेबांचं" पहिलं गाणं म्हणता त्याबद्दलच्या माहितीसाठी रसिक/वाचक निश्चितच उत्सुक असणार म्हणून उपलब्ध माहिती शेअर करतोय. मोहम्मद रफी साहेबांचं हे "पहिलंवहिलं" गाणं होतं.. "पहले आप" (१९४४) या चित्रपटातलं! "ए. आर. कारदार" निर्माते/दिग्दर्शक असलेल्या या चित्रपटाचे संगीतकार होते.. जिनियस "नौशादजी"! "मोहम्मद रफी" हा नवखा तरुण त्यांच्या केव्हाच नजरेत भरलेला. त्याच्या आवाजाची

"जातकुळी" त्यांना विशेष भावली होती. त्या काळात "के. एल. सैगल" या थोर "गायकाच्या" आवाज, सादरीकरण



वगैरे गोष्टींनी आपल्या "इंडस्ट्रीत" गायक/पार्श्वगायक म्हणून पदार्पण करणाऱ्या प्रत्येकावर.. "सैगलसाहेबांच्या" गायकीचा विलक्षण पगडा होता, हे काय मी सांगू? उदाहरणादाखल सांगायचं तर "तलत महमूद", "मुकेश" एवढेच नव्हे तर "किशोरकुमार" यांच्या आवाजातील त्यांची पहिली गाणी नुसती ऐका! मला नेमकं काय म्हणायचंय ते समजून जाल! नौशादजींनी चमत्कार वगैरे केला नाही.. पण "लतादीदी" यांच्यासह अनेक गायकांना त्यांनी मार्गदर्शन केलंय, हा बोलका इतिहास आहे! तर..

"रफीसाहेबांच्या" आवाजात "दडलेली" अशी एक खास बात आहे, ही त्यांच्या चाणाक्ष नजरेने हेरलेली. ती कोंडी नक्कीच "फुटायला" हवी, हा त्यांनी जणू मनाशी चंग बांधलेला! "पहले आप" या चित्रपटातले "गाणे" हे केवळ "निमित्तमात्र" होतं, हे निश्चित! असो!

"पहले आप" या चित्रपटाबद्दल आणि रफीसाहेबांच्या "पहिल्या" गाण्याबद्दल विस्ताराने सांगायचं तर यात.. "वास्ती, जीवन, अन्वर हुसैन, शमीम बानो, विद्या, चंदाबाई, दीक्षित, लैला, अल्लाउद्दीन, अमीर अली, श्यामकुमार आणि बी. एम. व्यास अशी "स्टारकास्ट" असल्याचे समजते. या गाण्याबद्दल सांगायचं तर ते एक "देशभक्तीपर" या "जॉनरचं" होतं. १९४३/४४ हा "स्वातंत्र्यपूर्व काळ" लक्षात घ्या. आपल्या देशाला "स्वातंत्र्य" मिळावं या सद्भावनेने सर्वच स्तरात एक उत्तुंग "देशभक्ती" जागृत झालेली. "चित्रपट" हे भले मनोरंजनाचे साधन! पण त्यातूनही एखादी "सिच्युएशन" निर्माण करत

"देशभक्तीचा" डोस दिला जाई. तुम्हाला कुठेतरी वाचनात आले असेलच.. त्या काळात "कीर्तनकार" वगैरे आपल्या त्या कीर्तनातून "विठोबा रखुमाई" यांची महती सांगता सांगता.. अचानक व हळूच "देशभक्तीविषयी" काही न काही डोस देण्यास विसरत नसत. ही माहिती मला "सन्माननीय श्री. बाबा महाराज सातारकर" यांनी त्यांच्या मुलाखतीत अगदी आवर्जून सांगितलेली! मूळ विषयाकडे वळायचे तर.. हे एक टिपिकल "देशभक्तीपर गीत" आहे. मात्र अतिशय परिणामकारक! यातले आश्चर्य पहा! नेहमी "रागदारी शास्त्रीय संगीत" देणारे म्हणून "ख्यातकीर्त" असणारे जिनियस संगीतकार "नौशादजी" यांनी ते संगीतबद्ध केलेय. गायक कोण? तर आपले "मोहम्मद रफी"! आणि त्यांच्या सोबत?? गायक/नट "श्यामकुमार" (सईद गुल हमीद अली), "अल्लाउद्दीन नावेदजी" आणि "बी. एम. व्यास" (ब्रिजमोहन व्यास.. अर्थात ते मूळ "पृथ्वी थिएटर्स" चे गायक व नंतर अभिनयाकडे वळले! त्यांचे

"बैजू बावरा" व "जय संतोषी माँ" मला या क्षणी आठवताहेत! असो!!) "नौशादजींना" मोहम्मद रफी हे रत्न तसं अवचितच गवसलं. "पहले आप" च्या पटकथेवर "कारदरमियांशी" चर्चा करताना, "रफीसाहेबांचे" ज्येष्ठ बंधू "हमीदभाई" एक शिफारसपत्र घेऊन सहजच भेटले होते. लखनौचा पत्ता शोधत नौशादजींच्या वडिलांकडून धाकट्या "रफीसाठी" त्यांनी ते पत्र मिळवलं होतं. जोहराबाई अंबालावाली आणि श्यामकुमार यांची एकूण पाच गाणी आधीच रेकॉर्ड झाली होती. पण कारदारमियाँ व नौशादजींनी "मोहम्मद रफी" या तरुण गायकाचा आवाज ऐकला मात्र! हिंदुस्तानात सगळीकडे "स्वातंत्र्याच्या वेडाने झपाटलेला माहौल" लक्षात घेत, त्यांनी चित्रपटात एक खास "सिच्युएशन" निर्माण केली. गीतकार डी. एन. मधोक यांच्याकडून खास "देशभक्तीपर" गाणे लिहून घेतले. मोहम्मद रफी यांच्या आवाजावर "सैगलचा" प्रभाव मुळीच नको, असे ठामपणे

बजावत.. फौजीच्या जीवनावरील गाणे म्हणता ते कसे "चैतन्यमय" असेल असे ते खुलवले. आणि "मोहम्मद रफी" याचा स्वर "कोलंबिया रेकॉर्डस" च्या तबकडीवर उमटला. , "तू दिल्ली, मैं आगरे, मेरे दिल से निकले.." तसंच.."एक बार उन्हे मिला दे.." अशी आणखी दोन गाणी "श्यामकुमार" यांच्या बरोबर गायला मिळाली.

नौशादजी यांनी "रफीचा" आवाज काहीसा

"अनुनासिक" होऊ नये किंवा थेट "सैगलजींसारखा" होऊ नये यासाठी, प्रचंड मेहनत घेतल्याचं.. मला (एक "श्रोता" म्हणून) प्रांजळपणे वाटतं. उदाहरणादाखल सांगायचं तर.. १९४६ च्या "अनमोल घडी" या चित्रपटातील, "नौशादजी" यांच्याच संगीतातील.. "तेरा

खिलौना टुटा बालक.." हे गाणं ऐका! या गाण्यात.. "सैगलजींचा" किंचितसा प्रभाव जाणवतो, हे त्यांनी "रफी" यांना अगदी आपलेपणाने पण कानपिचक्या द्याव्यात तसे अगदी ठळकपणे सांगितले होते, हे खरंच "ग्रेट"! नाही का? मग त्यांनी काय केलं? "तू एकदा तुझ्या "सैगलजी" या तुझ्या "आयडॉल" बरोबर एक गाणं गा..! मी संधी देतो! मात्र एक गोष्ट लक्षात ठेव... त्या गाण्यात तुझी एक "खास" अशी "पेशकश" येऊ दे..! असे नकळत का होईना पण"चॅलेंज" दिले! गाणं कोणतं..? तर ते गाणं होतं.. "मेरे सपनों की रानी, रूही रूही.."... चित्रपट होता "शहाजहान" (१९४६) आणि मोहम्मद रफी यांच्यासाठी केवळ "एकच ओळ" होती. पण "रफी" चक्क जिंकले. या क्षणी ते "नौशादमियाँ" यांचे "आवडते गायक" झाले! यातून झालं हेच की तरुण "मोहम्मद रफी" याचे आपला "आयडॉल" व "गुरुतुल्य" असलेल्या "के. एल. सैगलजी" यांच्याबरोबर "गाणे गाण्याचे" स्वप्नं साकार झाले! केवळ

एकच "ओळ" याची "खंत" तर अजिबात नव्हती . "गुरुतुल्य" अशा "सैगलजी" यांच्या सोबत एक "ओळ" गायला मिळाली, या आनंदात तरुण बच्चा "मोहम्मद रफी" अगदी बेशुमार व मनोमन खुश होता!

मोहम्मद रफी यांचा जन्म "कोटला सुलतान सिंह" गावातला! (जिल्हा अमृतसर - पंजाब, भारत) बुधवार दि. २४ सप्टेंबर, १९२४ ही जन्मतारीख! मोठे बंधू "हमीदभाई" यांचा तो अतिशय लाडका होता. ते रफी यांच्यासोबत सावलीसारखे असायचे. त्याचं हवं नको ते आपलेपणाने बघायचे. रफी यांच्या "उत्तुंग" यशात हमीदभाईंची "तपस्या" आहे, हे जरी खरं असलं तरी "ते त्यांचे वडिल बंधू आहेत" हा समज मात्र चुकीचा असल्याचे, "नौशादजींनी" त्यांच्या मुलाखतीत सांगताच, मी कसला उडालोय म्हणून सांगू. "बेटा, हमीदभाई हे रफी साहेबांच्या नात्यातले सुद्धा नव्हते. तर रफीसाहेबांच्या मोठ्या भावाचे जिवलग मित्र होते. रफींच्या आवाजावर विलक्षण प्रेम करणाऱ्या या

अवलियाने रफींना आपल्या सख्ख्या भावापेक्षाही अधिक प्रेम दिलं."! मोहम्मद रफी यांना पाच भाऊ! (मो. शफी, मो. दिन, मो. इस्माईल, मो. इब्राहिम, मो. सिद्दिक! त्यांना दोन बहिणी होत्या रेश्मा बिबी आणि चिराग बीबी! रफी साहेबांचं (१९३८) लग्न "बशिरा बीबी" या त्यांच्या नात्यातल्या मुलीशी झालं होतं. त्यांना "सईद" नावाचा मुलगा होता. भारत-पाकिस्तान "फाळणी" दरम्यान झालेल्या त्या दंगलीत "बशिरा बीबी" यांच्या आईवडिलांची दुर्दैवी हत्या झाली. आणि "बशिरा बीबी" यांनी "लाहोरला" परतण्याचा (१९४२) निर्णय घेतला. पुढे रफीसाहेबांनी १९४५ मध्ये "बिल्कीस बानो" यांच्याशी "विवाह" केला. "खलिद", "हमीद" आणि "शहीद" ही त्यांच्या मुलांची नावे! त्यांना तीन मुली सुद्धा होत्या.

रफीसाहेबांनी भारतातच राहण्याचा पक्का इरादा केला. मुंबईत ते १९४४च्या आसपास आले. त्यांनी आणि हमीदभाईंनी "भेंडीबाजार" या प्रचंड गर्दी असलेल्या

इलाक्यात "दहा बाय दहाची" खोली कशीबशी मिळवली होती. हमीदभाई, रफी आणि अब्दुल (गावाहून आणलेला. तोच त्यांची आपलेपणाने बडदास्त ठेवत असे!)

मुंबईतल्या अनेक संगीतकारांचे कामासाठी उंबरठे झिजविले. संगीतकार "श्यामसुंदर" (१९०८-१९५३) यांच्या "गुल बलोच" (१९४४) या "पंजाबी" चित्रपटात पहिली संधी मिळाली. गाणी होतं.. "सोणीयेणी हिरियेणी, तेरी यादणे बहुत सत्ताया.."! ("लिंक" दिलीय!)

यानंतर.. "नौशादजी" यांच्याकडे "पहले आप" (१९४४) साठी उपरोल्लेखित "हिंदोस्ता के हम.." हे गाणे गायले. याच आसपास संगीतकार "श्यामसुंदर" यांच्याकडे "गाँव की गोरी" (१९४५) या चित्रपटात "अजी दिल काबू में तो.." (सोबत जी. एम. दुर्राणी) हे गायला मिळाले. आता "मोहम्मद रफी" यांचे "पहिले हिंदी गाणे कोणते?" यावर काही लोकांमध्ये "संभ्रम" होता/आहे! "गाँव की गोरी" मधले गाणे "पहिले".. की "पहले आप" मधील "गाणे"

पहिले! आपण "नौशादजींचे" म्हणणे ऐकणे योग्य..! कारण त्या त्या चित्रपटाच्या "प्रदर्शनाची तारीख व वर्ष!" पाहता "पहले आप"चेच गाणे "पहिले" असावे, असे धरून चालूया! असो!

अनेक जणांना माहित नसेल (कदाचित)! मोहम्मद रफी यांनी रुपेरी पडद्यावर सुद्धा सहजच पदार्पण केले होते. "तेरा जलवा जिसने देखा.." ("लैला मजनू" - १९४५) आणि "वो अपनी याद दिलाने.." ("जुगनू" १९४७)! एक महत्त्वाचं सांगायचं तर.. "अनमोल घडी" (१९४६) मधलं "तेरा खिलौना टुटा बालक.." हे गाणं माझ्यासह कित्येक

तत्कालिन श्रोत्यांना काहीसं "सैगलाळळेलं" वाटलेलं, हे मात्र नक्की! "यहाँ बदला वफा का.." (गायिका "नूर जहाँ"

सोबत.. "जुगनू" (१९४७) सुद्धा ऐका! १९४६ ते १९५० या वर्षांचा विचार करता "रफी" यांनी नौशादजींकडे "चांदनी रात", "दिल्लगी", "दुलारी" आणि "श्यामसुंदर" यांच्या कडे "बाजार" आणि "हुस्नलाल-भगतराम" यांच्याकडे "मीनाबाजार" यातील गाणी दृष्टिपथात येतात!

यानंतरच्या काळात.. रफीसाहेबांनी "संधी" मिळताच आणि अनेक बुजुर्ग संगीतकारांकडून स्वतःचा "आवाज विकसित करण्याचं आणि खुलविण्याचं" खास तंत्र हासिल करताच, नंतर रफीसाहेबांनी स्वमेहनतीने अथक प्रयत्न, रियाज करत बुलंदीची शिखरे हासिल करायला नकळतच सुरुवात केली. लक्षात घ्या! आपले आणखी एक लाडके गायक "किशोरकुमार" यांचा तोवर उदय झाला नव्हता. ("मरने की दुवायें क्यो मांगू.." चित्रपट "जिद्दी" (१९४८) त्या आधी.. भले "मुकेशजी" यांनी "दिल जलता है तो.." ("पहली नजर" १९४५) द्वारे पदार्पण केले होते, परंतु "मोहम्मद रफी" यांच्या आवाजाची जातकुळी

या दोघांपेक्षा पूर्णतः वेगळी होती, ही गोष्ट स्वतः "रफीसाहेब" पूर्णतः जाणून होते, हे निश्चित!

तुम्हाला आठवतच असेल.. "लैला मजनू" (१९५३) मध्ये ज्येष्ठ गायक "खान मस्ताना" यांच्या "बुलबुल में है नगमे तेरे.." या गाण्यात "मोहम्मद रफी" हे यत्किंचित असे गायक होते! ("लिंक" पहा!) पण आपलं आयुष्य अमुक टप्यावर नेमकं कोणते वळण, व कधी घेईल, हे कुणालाही सांगता येत नाही. मला "खान मस्ताना" यांच्याबद्दल खचितच अत्यंत आदर आहे! (भले त्यांचे समकालीन वादक, संगीत संयोजक, एवढंच नव्हे तर संगीतकार आणि तत्कालीन पत्रकार सुद्धा.. "ते अतिशय गर्विष्ठ, तसेच खूपच

आत्मकेंद्रित" असल्याचं सांगायचे.)

फक्त अशा स्वभावाच्या व्यक्तीचा "दैवदुर्विलास" पहा! हे सांगताना मला खरंच मनातून अतिशय वाईट वाटतेय! पण स्पष्टपणे सांगायचे तर ते एक "ग्रेट गायक!" सॅल्युट! पण त्यांच्या दुर्दैवाने पुढच्या केवळ "तीन" वर्षांमध्ये, स्वमेहनतीने "रफीसाहेब" कुठे पोहोचले असतील? तर "शहीद" (१९६५) च्या "वतन की राह में, वतन के नौजवां शहीद हो.." या गाण्यात मुख्य गायक हे "रफी" होते आणि "खान मस्ताना" यांचा स्वर हा एका दुय्यम कलावंतासाठी वापरला गेला! कमाल आहे ना!

"मोहम्मद रफी" यांच्या आवाजातला "फ्रेशनेस, स्वीटनेस, रेंज आणि चमक" कधी दिसली? तर "नौशादजींनी" संगीतबद्ध केलेलं एक सर्वांगसुंदर गाणं (मीच नव्हे तर हजारो रसिकांच्या हृदयात अगदी ठळकपणे कोरले गेले आहे.) नौशादजींच्या "दुलारी" (१९४९) या चित्रपटातील "सुहानी रात ढल चुकी.." आत्ता

या क्षणी आठवतेय! (आमचा जन्म १९६० च्या दशकातला.. पण रेडिओवर विविध कार्यक्रमात ते अनेकदा लागायचं.) आम्ही बच्चेकंपनींनी ते तेव्हाच ऐकले होते. गाण्यांची आवड असल्याने ते केव्हा आवडीचे झाले, ते कळलेच नाही. अगदी "सॉफ्ट, सुरेल आणि काळजाचा ठाव घेणारे ते सादरीकरण! त्यातला "अभिनेता" कोण? हे माहितच नव्हतं, पण ते "मस्त गाणं" त्या काळात काळजावर कोरलं गेलं होत, हे मात्र नक्की! हा सिनेमा "दूरदर्शनच्या" काळात तिथे भले दाखवला गेला असेल.. पण फक्त लक्षात राहिला तो "सुहानी रात ढल चुकी.." मधला रफीचा तो "आवाज.. ते सादरीकरण"!

(मित्रांनो, आपलेपणाने सांगतोय! मी १९९५ सालात जेव्हा हा प्रदीर्घ असा लेख लिहिला होता (१९९५), तेव्हा आत्ता उपलब्ध असणारे "इंटरनेट" किंवा चक्क "गुगल" सुद्धा नव्हते! जर ते असलेच.. तर माझ्या पिढीला तरी अजिबात माहित नव्हते. हे मात्र नक्की! या चित्रपटाबद्दलची माहिती अक्षरशः थक्क करणारी आहे!)

हा सिनेमा "ए. आर. कारदार" यांचा! कलावंत कोण? तर.. "मधुबाला, सुरेश, गीताबाली, श्यामसुंदर, जयंत आणि इतर!" यात "स्टारकास्ट" जबरदस्त असावी, हे तर "कारदार प्रॉडक्शन्सचे वैशिष्ट्य! यातली "सर्वच गाणी" मनाला नक्कीच भावणारी होती! "लिंक" नक्की आवर्जून पहा! अशी गाणी ही आपल्या "संगीत प्रेमींसाठी" खचितच पर्वणी असते! असो!! "मोहम्मद रफी" यांनी मग मागे वळून पाहिलेच नाही. अलौकिकतेची परिसीमा असलेली स्त्रीगायिका म्हणजे आपली लाडकी लतादीदी" होती तस्साच "अमर्याद पुरुषोत्तम" म्हणून "मोहम्मद रफी"

रसिकांच्या आपसूकच समोरा आला. त्याच्या आवाजाला "मर्यादा" नव्हतीच! "अशक्य" हा शब्द, त्या आवाजाला जणू ठाऊकच नव्हता! तो कुठलंही, किंवा कोणत्याही "जॉनरचं" गाणं, सहजगत्या गायचा! एखाद्या व्यक्तीच्या "बहुगुणी" किंवा त्याच्यात काही अमुक "खास वैशिष्ट्य" असलेल्या एखाद्या व्यक्तीच्या मागे.. काहीही कारण नसताना.. उगीचच "दैवदुर्विलास" लागणे.. हे आपण अनेकदा अनुभवतो! हे थेट काही "देव-देवस्की" अशा "अंध-श्रद्धेबद्दल" नसावे! यात शंकाच नाही! परंतु "रफीसाहेबांना" ही अमुक गोष्ट.. त्यांच्या परिचयातील अमुक व्यक्तीने थेट सांगितल्याचे, एका ज्येष्ठ वादकाने मला सांगितले होते.. मला तरी आश्चर्यात टाकणारे होते! त्यांच्यामुळेच माझ्या हे ऐकिवात आले होते!, हे नक्की! हटाओ यार!! असो! मोहम्मद रफीसाहेबांचा स्वर बहरत होता, हे जास्त महत्त्वाचे नाही का??

खरं सांगायचं तर.. बुजुर्ग "समीक्षक, पत्रकार,

अभ्यासक" यांनी उर्धृत केलेल्या त्यांच्या अमुक लेखांमधून "तलत महमूद, हेमंत कुमार इतकेच नव्हे तर किशोर कुमार" यांच्या "पहिलीवहिल्या" गाण्यांवर का कुणास ठाऊक "सैगलसाहेबांच्या" गायकीचा "विलक्षण प्रभाव" हा "ठळकपणे" जाणवतोच...!! अशा पुरुष गायकांच्या गायकीवरील "सैगलजींचा" प्रभाव कुणी दूर केला असेल बरं! प्रांजळपणे सांगायचं तर ती कोंडी.. क्रमाने.. "नौशादजी, सी. रामचंद्र, ओ. पी. नय्यर" वगैरे संगीतकारांना देण्यात काहीच हरकत नाही. (यात "मतभेद" नक्कीच असू शकतात. कारण.. माझा १९६० मधला जन्म म्हणता.. बुजुर्ग अभ्यासकांनी अवश्य यावर टिप्पणी करावी, जी आमच्या पिढीसाठी तसेच एकंदर सर्वांनाच मार्गदर्शक ठरेल.)

"अलौकिकतेचा परिसस्पर्श" लाभलेली आपली सर्व स्त्री - गायिकेतील "लतादीदी", तसेच पुरुष गायकांतील "अलौकिक" आवाज लाभलेले "अमर्याद पुरुषोत्तम"..

मोहम्मद रफी साहेब! "अशक्य" हा शब्द त्यांना ठाऊकच नव्हता. कुठलेही गाणे ते सहजच गायचे. गाण्याच्या मध्यवर्ती आशय आणि संकल्पना यानुसार जान ओतायचे. त्यांनी एकच गाणे नम्रपणे नाकारले. तेही कुठले?.. तर आपल्या "श्रीनिवासजी खळे" यांच्या एका गाण्याला! "चुकचुकली पाल एक.." हेच ते गाणं!

मूळचे "पंजाबी" लोक पंजाबी, हिंदी तसेच उर्दू" शब्द" भले सहजच उच्चारतात, होय ना! पण त्यांना मराठीतील "च" यातली "विविधता" अजिबात उच्चारता येत नाही. "ळ" किंवा "ष", "झ" तर विचारूच नका. उदाहरण म्हणून सांगायचे तर आपण मराठी माणसे "खुदा" (खणले) आणि उर्दूतला "ख़ुदा" (परमेश्वर) याच्या उच्चारात गल्लत करतोच ना? तसंच काहीसं इथे घडलं! अनेकदा "चुकचुकली पाल एक.." या गाण्याच्या मुखड्यातच रफीसाहेबांची "दमछाक" झाली. "वसंत निनावे" यांचं काव्य मस्तच होत. "खळेकाकांची" चाल

छानच होती, पण त्यांच्या चाली गायला अतिशय कठीण असायच्या, हे मात्र नक्की. अनेक "रिहर्सल्स" नंतर त्यानी नम्रपणे "नाही" म्हटलं! यामुळेच की काय ज्येष्ठ सन्मा. संगीतकार "श्रीकांतजी ठाकरे" यांनी "मोहम्मद रफी" यांच्याकडून अनेक मराठी गाणी गाऊन घेताना, हे भान राखलं असावं!, असं म्हणायला हरकत नाही.

मोहम्मद रफीजी आणि संगीतकार सन्मा. श्रीकांतजी ठाकरेसाहेब (आपल्या "राजसाहेबांचे" वडील) या जोडीने मराठी संगीत सृष्टीला अनेक अजरामर गाणी दिली आहेत. सन्मा. श्रीकांतजी यांच्याबद्दल थोडक्यात सांगायचं तर.. सन्मा. श्रीकांतजी

हे गुणी, चतुरस्र संगीतकार होते. ते सन्मा. बाळासाहेबांचे बंधू होत. एक अत्यंत "जिनियस" संगीतकार, ज्यांच्या संगीतात शोभाताई गुर्टू, निर्मलादेवी (गोविंदाच्या मातोश्री), अनुराधा पौडवाल, सुरेश वाडकर, हरिहरन व कविता कृष्णमूर्ती यांनीही गाणी गायली आहेत. परंतु का कुणास ठाऊक, त्यांचे "रफीजींसोबत" छान सूर जुळले होते. थोडक्यात सांगायचं तर मोहम्मद रफी यांनी मराठी गाणी गायली, ती केवळ आणि केवळ श्रीकांतजी यांच्याकडेच!

मोहम्मद रफी हे त्यांच्याकडे मराठीत गायला कसे तयार झाले असतील बरं!? मघाशी सांगितल्याप्रमाणे उत्तरेतील गायकांवर "पंजाबी, हरियाणवी" भाषेचा विलक्षण पगडा असतो. ते अस्सखलीत "उर्दू" भले अस्स्खलितपणे सहजच शकतात परंतु प्रादेशिक भाषा असलेल्या "मराठीतील"

काही मुळाक्षरांशी, त्यांचे "विळ्या-भोपळ्यासारखे वैर असते! ते मराठीतले "ळ, श, ज्ञ.. ही त्यांच्याकडून उच्चारून घेणे तर कर्मकठीण काम! "चहा" मधला "च" आणि "चमचा" मधला "च" तर महाकठीण!

सन्मा. श्रीकांतजी (पप्पा) यांना "उर्दू" भाषेचं पूर्णतः ज्ञान होतं, त्यांनी प्रत्येक गाण्यातील शब्द हे "उर्दूतून" लिहून देत रफीजींना मस्त विषद करून सांगितले होते, त्यामुळे रफीसाहेब निश्चिंत झाले होते. रफी साहेबांनी त्यांनी गायलेली मराठी गाणी नक्की ऐका! यात "च" मुळीच आढळणार नाही. गाण्यांची यादीच थक्क करणारी आहे.

"शोधिसी मानवा राऊळी मंदिरी..", "नको आरती की नको पुष्पमाला..", "हसा मुलांनो हसा.." (बालगीत), "हा छंद जिवाला लावी पिसे..", "प्रभू तू दयाळू..", "अगं पोरी संभाल दर्याला.." (कोळीगीत),

"प्रभू रे खेळ तुझा न्यारा..", "माझ्या विराण हृदयी..", "विरले गीत कसे..", "नको भव्य वाडा..", "हा रुसवा सोड सखे.." आणि "अरे हे दुःखी जिवा बेकरार होऊ नको.." (मराठी चित्रपट; शूरा मी वंदिले)! वैशिष्ट्ये सांगायची तर ही गाणी मुख्यतः १९६०-१९७० च्या दशकातली आहेत. अनेक गाण्यांच्या कवयित्री या वंदनाताई विटणकर होत्या. ही गाणी आजही लोकप्रिय आहेत, हे विशेष! प्रसिद्ध गायक "महेंद्र कपूरजी" (मुळचे "पंजाबी"च की हो!) म्हणजे अर्थात आपल्या "मोहम्मद रफी साहेबांचे" शागीर्द! यांचे अजरामर झालेले 'अबोल झालीस का..?' (त्यांचे पहिले मराठी गाणे.) हे गाणे आठवतेय? ते १९६३ मध्ये रिलीज झाले होते! या सुंदर भावगीताला संगीतकार राम कदम यांनी संगीत दिले होते, आणि हे गाणे आजही रसिकांच्या मनावर राज्य करत आहे. आपल्या गुरुतुल्य

"रफीसाहेबांनी" मराठी गाणी गायलीत म्हणता, शागीर्द "महेंद्र कपूरजी" (पापाजी) यांनी प्रेरणा घेतली असेल का? असेल! नक्कीच असू शकते!

१९६० ते १९७० हे दशक कुणी गाजवलं असेल तर "लाऊडस्पिकरवाल्यांनी"! "एच. एम. व्ही." या मातब्बर कंपनीने "राइट्स मिळालेली" गाणी "ई पी" रेकॉर्ड्सवर प्रकाशित करण्याचा जणू धडाकाच लावला होता. चित्रपटातील गाणी "ई पी" रेकॉर्डस् वर आणणे होतेच, तसेच कित्येक मराठी गाणी सुद्धा ते सतत देत असायचे! मोहम्मद रफी व श्रीकांतजी यांची गाणी जास्तीतजास्त गाजवली ती "लाऊडस्पिकर वाल्यानी" असे म्हणणे योग्यच आहे!

एक आठवण सांगतो! उन्हाळी सुट्ट्या लागल्या की आमच्या लहानपणी "कित्येक तास अविरतपणे सायकल चालवणारे आमच्या पटांगणात हमखास

यायचे. मध्ये बांबू व्यवस्थित लावून ते त्या बांबू किंवा कमान याभोवती सलामगपणे प्रदक्षिणा घालायचे, नॉन-स्टॉप! त्यांना कोण "प्रायोजित" करायचे किंवा त्यातील त्यांचे नेमके अर्थकारण काय वगैरे गोष्टी आम्हाला तरी अजिबात माहित नव्हत्या. ते एकीकडे लाऊड स्पीकरवर गाणी वाजवायचे. त्या "विक्रमवीरची" अमुक मंडळी दुसऱ्या सायकलवर "नृत्य करणे, स्टंट करणे" वगैरे उद्योग करत असत. गर्दी वाढली की त्या गर्दीत "कटोरा" फिरवला जायचा. आमची "साध्या मध्यमवर्गीयांची वस्ती" पण "तो अविरतपणे सायकल चालवतोय" म्हणून त्याला मदत म्हणून सढळ हाताने पैसे देत. कधीकधी या मंडळींमध्ये "जादूगार" सुद्धा येत असे. आमच्या बच्चेकंपनीसाठी ही भन्नाट करमणूक असायची. त्यांच्या लाऊडस्पीकरवर "उडती" गाणी असत. यात

खुपदा "रफी साहेबांची" भन्नाट गाणी असायची. "शादी के लिये रजामंद करली..", "हम काले है तो..", "मेहबूबा मेहबूबा बनाल्यो मुझे..", "हम को तुम पे.." अशा जबरदस्त गाण्यांवर नाचत माहौल बनविला जायचा. आमच्या कित्येक पिढींनी त्यातून काही गाणी नव्यानेच ऐकली बरं! उतरत्या रात्री मिणमिणत्या प्रकाशात तो एकीकडे सायकल चालवत रहायचा. पहाटे दुधवाले, पेपरवाले यायची वेळ होताच, तो सायकलवरच आंघोळ उरकायचा. कपडे सुद्धा शिताफीने बदलायचा. सकाळी नऊ वाजले की त्यांचा "लाऊड स्पीकर" सुरू व्हायचा. कुणी त्या ग्रुपसाठी "चहा -नाश्ता" देत असे. धमाल होती सगळी.

इराणी हॉटेल्स मधला "ज्युक-बॉक्स", त्या पिढीतल्या रसिकांना "चवन्नी" टाकताच भले "हिंदी चित्रपटगीतांचा" रतीब घालायचा, पण घरोघरी

"साखरपुडा, हळद, लग्नसमारंभ, वाढदिवस, सत्यनारायणाची महापूजा, गणेशोत्सव, दसरा, दिवाळी अशा अनेक "आनंददायी" समारंभात, हे "लाऊडस्पिकरवालेच" अशी गाणी वाजवायचे, ती लोकांना आवडती अशीच! आम्हां बच्चेकंपनींनी "मोहम्मद रफी" साहेबांची गाणी ही "लाऊडस्पीकर वाल्यांमुळेच" ऐकली, ही नक्की!

रेडिओवर ती भले यायची, पण कधी कधी! "लाऊडस्पिकरवाल्यांमुळे" हासिल झालेली ही गाणी आम्ही "पाठ" करायचो. ती गाण्याचा प्रयत्न सुद्धा करायचो, हे महत्त्वाचं! आमच्या लहानपणी म्हणजे सत्तरच्या दशकात विविध "आंतरशालेय गायन स्पर्धां"मध्ये आमचा सहभाग असायचा. यात आम्ही अनेक पारितोषिके सुद्धा मिळवली आहेत. ही सगळी "पारितोषिके" तुम्हाला, आमच्या "रॉबर्ट मनी

शाळेच्या" सन्माननीय "प्रिन्सिपॉल साहेबांच्या" केबिनमध्ये सहजच पहायला मिळतील! व्वा!! काय ते दिवस होते. "मोहम्मद रफी" या जिनियस गायकाने आमच्या पिढीवर, स्वत:च्या गायन कौशल्यतेने जो काही प्रभाव टाकलाय, तो केवळ अतुलनीय! आम्ही कायम "उपकृत" आहोत! सलाम रफीसाहेब!

पुढे "चुकचुकली पाल एक.." हे गाणं नंतर "लतादीदींनी" गायलं! ("लिंक" दिली आहे.) तुम्हाला "हे चिंचेचे झाड दिसे मज.." हे गाणं आठवतं? "महेंद्र कपूर जी यांनी (पापाजी) ते बिनधास्त गायलंय! "टीका करणारे करत राहिले!" असो!

तर.. "अशक्य" हा शब्द त्या गव्व्याला ठाऊकच नव्हता. "इन्साफ का मंदिर है ये.." हे गाणं आठवा! (गायक : रफी, गीतकार : शकील बदायुनी, संगीत : नौशादजी, अभिनेता : दिलीप कुमार! "अमर" (१९५४) "भक्तिगीत" सदृश गीतात जान ओतली आहे रफीसाहेबांनी! (स्पष्टपणे

सांगायचं तर हे गाणं सहसा "लाईव्ह कॉन्सर्ट, ऑर्केस्ट्रा, मैफल" किंवा इतरत्र सादर करण्याची हिंमत कुणी केली असेल का? निदान मला तरी माहित नाही.)

"इन्साफ का मंदिर.." हे "भक्तिगीत" सदासुहागन म्हणून गौरविल्या जाणाऱ्या "भैरवी" रागात असल्याचे "म्या पामराला" कळताच अक्षरशः थक्क झालो. "यू ट्यूब" वरील काही महाभागांच्या "प्ले-लिस्ट" मध्ये.. या मस्त गाण्यानंतर लगेचच "सर जो तेरा चकराये.." हे गाणं यावं, यापेक्षा दुसरा दैवदुर्विलास नाही! हादरलो! आणखी काय?? अनेक "अल्बम्स" बाबतीतही तेच घडताना पाहिलंय. "अभिरुचीहीन"! मला आठवतंय..! कॅसेटचा जमाना येताच "एच एम व्ही" ने अनेक अल्बम मार्केटला आणायला सुरुवात केली होती. "ऋणानुबंधाच्या.." हे काय "पहाटेचे भक्तिगीत किंवा भूपाळी" आहे का? पण त्यांनी हे गीत त्या "कॅसेटवर".. भूपाळीसोबत बिनधास्त सादर केलेलं आठवतेय. (हा अल्बम नंतर "सी. डी." वर देताना,

भान राखलंय!) "चांद" या विषयावरील "कॅसेटमध्ये" तर "चांदी की दीवार न तोंडी.." बिनधास्त घुसडलेलं! "मराठी प्रेमगीतांच्या" कॅसेटमध्ये तर "तुझ्या गळा माझ्या गळा.." भाऊ-बहिण यांचं गाणं, पण हे गाणं "प्रेमगीत" म्हणून दिलेलं मी स्वतः पाहिलंय! "अल्बम" बनविणाऱ्याच्या डुलक्या! आणखी काय!? असो!!

रफीसाहेबांची गाणी अभ्यासताना लक्षात येतं की हा चतुरस्र स्वर "रागदारी" ते त्याच गव्व्यातून सादर झालेला! "जॉनी वॉकर" चा पिचक्या बांबूचा आवाज सुद्धा सहजच समोरा यावा? हे या चतुरस्र गायकाचे "गुण" ठळकपणे अधोरेखित करते. सलाम.. रफीसाहेबांना! या "स्वर्गीय" आवाजाने.. "इन्सान बनो.." (राग "तोडी"), "मन तडपत हरिदर्शन को.." (राग "मालकंस"), "ओ दुनिया के रखवाले.." (राग "दरबारी") ही "बैजू बावरा" ची गाणी! "कोहिनूर" मधलं "मधुबन में राधिका.." (राग "हमीर"), तसेच "लीडर" मधले "इक शहेनशाह ने.." (राग "ललत"),

"दिल दिया दर्द लिया" चे जबरदस्त "शीर्षकगीत" (राग "सारंग"), "दिल-ए-बेताब को सिने से.." (राग "यमन कल्याण") अशा अनेक "शुद्ध शास्त्रीय संगीतातील" जबरदस्त "चीजा", "भक्तिगीते" ज्या कंठातून पाझरल्या त्या "स्वरगंधर्वाला" मनोमन "कुर्निसात"!

गंमत म्हणजे.. याच कंठातून "हमें काले हैं तो क्या हुवा दिलवाले हैं.." आणि "मेहबूबा मेहबूबा बनाल्यो मीजे दुल्हा.." अशा "टिपिकल" गाण्यातून चक्क हैदराबादी "टोन" मिळावा? "मैं जट यमला पगला दिवाणा.." या गाण्यातून चक्क "पंजाबी" भाषा ऐकायला मिळावी, यासारखी चतुरस्त्रता, केवळ वंदनीय! ("सन्मा. मन्नादा" सुद्धा ग्रेट होते म्हणा..! "जोडी हम्मारी जम्मेंगा कैसे जानी.." तसेच "एक चतुरनार.." या गाण्यातील त्यांची पेशकश खचितच "मान गये उस्ताद!" अशीच होती, म्हणा!) पण "मोहम्मद रफी" त्यावर कडी करणारे ठरले, हे निश्चित! रफीसाहेबांच्या बाबतीत, ही गोष्ट मला चक्क

"सन्मा. मन्नादा" यांनी "रफीसाहेबांबद्दल" आदर व्यक्त करताना अगदी आपलेपणाने सांगितलेली!

मोहम्मद रफी यांच्या गाण्यांचा आलेख पाहता. थक्क व्हायला होतंच होतं! आणखी काही उदाहरणे सांगायची तर "सुनहरी गोठे में..", "ऑल लाइन क्लिअर..", "तय्यब अली प्यार का दुश्मन..", "चाहे कोई मुझे जंगली कहे..", "अय्यया सुकुसुकु..", तर "फास्ट" (वेगवान) म्हणावीत अशी.. "हम को तुम पे..", "ओ दिलबर जानिये.." अशी अनेक उदाहरणे देता येतील!

"शम्मी कपूर", "जितेंद्र", "शशी कपूर" यांचा धसमुसळेपणा अगदी तंतोतंत, अगदी त्याच्या लकबीसह खुलवला होता. ग्रेट! तर दुसरीकडे.. "मैं जिंदगी का साथ निभाता..", "तुम से कहू इक बात..", "तेरी आँखो, के सिवा..", "अपनी आँखो में बसाकर..", "चराग दिल का जलाओ..", "तुम मुझे यूँ, भूला न पाओगे..", "दिल का भंवर करे पुकार..", "तू कहाँ ये बता..", "ऐसे तो ना देखो, के

हमको..", "मेरा मन तेरा प्यासा..", "खोया खोया चांद.."..
किती गाणी सांगू? एकेक गाणे म्हणजे टपोऱ्या मोत्याच्या दाण्यासारखे जबरदस्त आहे.

मोहम्मद रफी यांची "देशभक्तीवर" सुद्धा अनेक गीते आहेत. या यादीमध्ये "मेरी आवाज सुनो.." (नौनिहाल) नाहीय. कारण ते सर्वथा वेगळं आहे. हे गाणं "पं. जवाहरलालजी नेहरू" यांना समर्पित आहे. नक्की ऐका! तर.. आता तुम्ही म्हणाल.. ही तर तुमच्या आवडीची गाणी झाली. आमच्या आवडीबद्दल काय!? "येस!" मोहम्मद रफी यांचे "यू ट्यूब" वर जेवढे म्हणून "अल्बम्स" सापडले, त्याची ही एक झकास "प्ले-लिस्ट" मी खास तुमच्यासाठी परिश्रमपूर्वक बनवली आहे! हाय काय नी नाय काय! फुरसतीच्या क्षणी "हेडफोन" लावून मस्त निवांतपणे आस्वाद घ्या! या "ई-बुक" च्या माध्यमातून आपली ही "थेट भेट" म्हणून मनापासून आणि आपलेपणे तुमच्याशी एक सर्वसामान्य रसिक म्हणून संवाद

साधतोय!! कृपया या बाबतीत राग नसावा! शेवटी मी सुद्धा तुमच्यासारखाच "संगीतवेडा" आहे म्हणून ही नम्र विनंती! असो! आमच्या, म्हणजे आत्ता या क्षणी "पासष्टीपार" असलेल्या माझ्या पिढीला "रेडिओ", इराणी हॉटेलमधला "चार आण्याचे कॉइन" (चवन्नी) टाकताच आवडते गाणे ऐकवणारा तो "ज्युकबॉक्स"; किंवा कोणत्याही "समारंभा निमित्त" आमच्या चाळीत येणारा तो "लाऊड स्पीकरवाला" हाच सुपरहिट गाणी ऐकण्याचा एक मस्त "सोर्स" होता हो! याच मिळालेल्या शिदोरीतून "मोहम्मद रफी" यांच्या गायकीचा "अभ्यास" करताना एक गोष्ट हमखास जाणवली! ते अमुक गाणे ऐकताना, ते कुणाच्या तोंडी असेल बरे! हे आम्ही "रसिक श्रोते" मात्र खुपदा.. चक्क बिनधास्त अंदाज बांधायचो. तुम्हाला आपलेपणाने सांगतोय. आमच्या पिढीला रेडिओवरील "बिनाका गीतमाला" या प्रत्येक "बुधवारी" संध्याकाळी "आठ वाजता" प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमाने खूप नादवले होते!

एरवी "अभ्यास" करायला मारून मुटकून बसायला सांगणारे.. आमचे पालक, का कुणास ठाऊक! या "बिनाका गीतमाला" सादर होण्याच्या क्षणी मात्र खूपच "सौम्य" व्हायचे! सदर होणाऱ्या गाण्याची "यादी" बनवणे, हे आमच्या शाळेच्या "होमवर्क" पेक्षा महत्त्वाचे काम आमच्याकडे असायचे! ते केलं की आमच्या "मस्तीचे" सगळे मुद्दे पूर्णतः माफ असायचे!

तर.. "मोहम्मद रफी" यांची गाणी ऐकताना.. त्याचे "फिल्मांकन" कोणत्या "नायकावर" झालेय, हे किमान आमच्या "पिढीला" तरी केवळ "अंदाज" म्हणून का होईना. थोडेफार लक्षात यायचे! "मेरे पैरों मी घुंगरू बंधा

दे..", "नैन लड़ जेंहे तोह मनवा..", "आयी है बहारें..", "सुख की सब साथी.." अशी दिलीपकुमारसाठी गाणी गाणारे "मोहम्मद रफी" सहज लक्षात यायचे! "मोहम्मद रफी" याच्या ,सर्वच्या सर्व गाण्यांचा "लेखाजोखा" एखाद्या "लेखातून" किंवा एखाद्या "ई-बुक" मधून साकारायचा तर "बोरिवली-कांदिवली" दरम्यानचे ते "फूड कॉर्पोरेशनच्या" मालकीचे "धान्याचे" जे "कोठार" आहे ना! त्यातील प्रत्येक पोत्यातल्या, प्रत्येक दाण्याचा हिशेब काटेकोरपणे मांडण्यापेक्षाही जिकिरीचं आहे! लाहौलवलाकुव्वत!!

मोहम्मद रफीसाहेब यांनी अभिनेते "अशोक कुमार" ते प्रदीपकुमार, ते थेट "जॉनी वॉकर" अशा सर्वच प्रवृत्तीच्या कलाकारांसाठी आपला उसना आवाज दिला. मुख्य म्हणजे ते खटकायचेही नाही. "हिरोसाठी", "कॉमेडियनसाठी", "बेवड्यासाठी", "व्हिलनसाठी" एवढंच नव्हे तर "भिकाऱ्यासाठी" सुद्धा तो आवाज काळजाला भिडायचा. "जगदीप" या तत्कालीन

"कॉमेडियन" वर "पुनर्मिलन" चे "पास बैठो तबीयत बहल जाएगी.." हे गाणं तो "हीरो" म्हणून चित्रित झालंय, हे बघताना जसं खटकत नाही, तसंच "आदमी मुसाफिर है, आता है जाता है.." (अपनापन) हे भिकाऱ्यावरचं गाणं सुद्धा अजिबात खटकत नाही!

"दोनो ने किया, था प्यार मगर.." (महुआ), "ये दुनिया ये महफिल.." (हीर रांझा), "तकदीर का फसाना.." (सेहरा), "आज पुरानी राहोंसे.." (आदमी), "दिल का सूना साज.." (एक नारी दो रूप), "कह दो कोई ना, करे यहाँ प्यार.." (गुंज उठी शहनाई) अशा गाण्यांमधून रफी साहेबांची "रेंज" सापडते खरी, पण प्रत्यक्षात संवाद साधताना ते अगदी खालच्या पट्टीत बोलायचे. त्यांना अतिशय रागावलेलं किंवा बोलतानाचा आवाज "गंधार" सुराच्या वरच्या पट्टीत गेलाय, असं कधीच घडलं नाही. "महेंद्र कपूर" (पापाजी) हे "रफीसाहेबांचेच" शिष्योत्तम! रफीसाहेब पापाजींवर दिलोजानसे मेहनत घ्यायचे.

"आपलं आजच हे "गाणं" त्यांचीच देन.." असं ते नेहमी सांगायचे. रफींच्या मृदु स्वभावाबद्दल सांगायचं तर "पापाजी" यांनी सांगितलेला हा "किस्सा" पहा.

"भेंडी बाजारातलं" रफींचं घर! एक सतत गजबजलेला असा तो इलाका! "हार्मोनियम" समोर पापाजी बसलेत! "हार्मोनियमवर" रफींची बोटं शिताफीने फिरतायत तोच त्याचं वर लक्ष गेलं. रफींचा पाचेक वर्षे वयाचा मुलगा "शाहिद", पोटमाळ्याच्या शिडीवर चढत चढत तो लाकडाच्या "बीम" पर्यंत पोहोचलाय! ते दृश्य पाहून पापाजी आणि रफी दोघांचेही धाबे दणाणले! आता या बेट्याचा पाय तोल जाऊन घसरला तर..!! पोरगं सरळ दहा-बारा फूट खाली कोसळणार! रफीसाहेब "देव आनंदच्या" चपळाईने उठले. (बहुदा "छडी" शोधायला!) आता बेट्याची खैर नव्हती! आता तारसप्तकात करवादणं, चिडचिड, फटके! पण कसचं काय?! ते शांतपणे म्हणाले.. "ए.. शाहिद बेटा.. क्या कर रहेला है तू!! गिरेगा ना!..चल

उतर-उतर! नीचे आ..!"' पापाजींना वाटलं.. बहुदा आता तो हातात आल्यावर "फटके" देतील! पण.. रफींनी त्याला शांतपणे मांडीवर घेत. केलेल्या कृत्यातील "धोके" आपलेपणाने समजावले! इतक्यात भाभीजी बाहेरून आल्या. दुसरा कुणी असता तर त्या प्रसंगाची "चुगली" करत, फटके देण्याचे आदेश हमखास दिले असते. रफींनी शांतपणे लेकराला तिच्याकडे सोपवले आणि शिकवण्यात गढून गेले! त्यांचा तो मृदुपणा पाहून इकडे पापाजी मात्र गहिवरून गेले होते.

अशा मृदु स्वभावामुळे रफीजींनी माणसे मात्र खूप जोडली. पैशाअभावी कुणाच्या "पिक्चरचं" गाणं अडले असेल तर ते त्या निर्मात्यासाठी चक्क फुकट सुद्धा गायले तसेच वादकांचे मानधन स्वतःच्या खिशातून दिल्याची उदाहरणे बरीच आहेत. "गुलाम हैदरजी", "नौशादजी" ते थेट भडक माथ्याच्या "सज्जादजी" यांच्यापर्यंत सर्वांशीच ते नम्रपणेच वागले. संगीतकार गाणं समजावताना ते आज्ञाधारक बालक असल्यागत मनाची पाटी कोरी करून बसायचे. (एक उदाहरण सांगतो. १९७० साली चतुरस्र संगीतकार "सी. रामचंद्र" साहेबांनी "शिर्डीचे साईबाबा" हा ऑडिओ अल्बम बनविला होता. यात एक पद आहे.. "हरिद्वार मथुरा काशी.."! सी. रामचंद्रजी यांनी रफीसाहेबांना "हरिद्वार" मधला "रि" हा ह्रस्व असल्याचे आवर्जून सांगितलेले. मग काय! रफीसाहेबांनी तो अगदी तंतोतंत उच्चारला आहे. (ऐका!) आणखी एक उदाहरण सांगायचे तर.. सन्मा. कुमारसेन समर्थ साहेबांनी (हे

शोभनाजी समर्थ यांचे पती व नूतन, तनुजा याचे वडील!) "शिर्डीचे साईबाबा" (१९५५) या चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन केले होते. "केशवराव साठे" यांनी निर्मिलेल्या या चित्रपटाचे संगीत दिग्दर्शक होते "पांडुरंग दीक्षितजी"! कुमारसेनजी हे निस्सिम साईभक्त होते! लक्षात घ्या..! हा चित्रपट "मराठी" होता.. परंतु त्यात "शीर्षकगीत" म्हणून "काहे को तीरथ जाता रे भाई.." हे मोहम्मद रफी यांचे हिंदी "भक्तिगीत" होते. (नक्की ऐका!)

"मनोजकुमार" यांच्या (निर्मिती "सरला चॅरिटी ट्रस्ट"!) "शिरडी के साईबाबा" या चित्रपटात "रफी साहेबांची" गाणी होती "साईनाथ तेरे हजारो हाथ.." (पडद्यावर शत्रुघ्न सिन्हा!) हे एक, तर.. "साईबाबा बोलो.."! या चित्रपटाचे सुद्धा संगीत दिग्दर्शक "पांडुरंग दीक्षितजी" होते! चित्रपटाची, त्यातल्या सर्व गाण्यांची "लिंक" सुद्धा देतोय! नक्की पहा, ही विनंती!

तर..आपले रफीसाहेब कोणत्याही संगीतकारा

समोर मग तो नवखा असो की मातब्बर! त्यांच्यासमोर ते मांड ठोकून, अगदी आज्ञाधारक विद्यार्थ्यांप्रमाणे बसायचे..



ते चाल पूर्णतः समजून घेत, पडद्यावर नायक कोण आहे? असं नम्रपणे विचारायचे. यामुळेच गाण्याची "सिच्युएशन" जणू साक्षात सामोरी यायची. तिथे गीतकार असले तर मस्तच! गीतकार गाण्याच्या सादरीकरणावर सहजच भाष्य करत, त्यामुळेच गाण्यात रंग भरले जात असावेत!

सुरुवातीला आपल्या पुढील करिअरबद्दल अतिशय साशंक असल्यानेच की काय.. काही घटनांमुळे मनाशी उगीचच खंत बाळगणाऱ्या.. "रफीसाहेबांच्या".. त्या नंतरच्या "फिनिक्स पक्षासारख्या" उत्तुंग भरारीबद्दल आपलेपणाने सांगायचं तर.. ज्या "लैला मजनू" (१९५३,

शम्मी कपूर, नूतन अभिनित) मध्ये "बुलबुल में है नगमे तेरे.." या कव्वालीत "खान मस्ताना" हे मुख्य गायक तर रफीजी हे दुय्यम गायक होते! पण का कुणास ठाऊक, तिथे सहगायक म्हणून आलेले "रफी" आणि "कोरस" म्हणून आलेल्या सर्वांशी ते अतिशय "फटकाळपणे" व अपमानास्पद वागले होते! (सहागायकांसोबत "मुख्य गायकाची" अशी वागणूक, खचितच चुकीची आहे. (मी मातब्बर अशा "व्हीनस म्युझिक कंपनी" मध्ये त्या कंपनीचा "म्युझिक इन्चार्ज" असताना स्वत: अनुभवली आहे. "कुमार शानू, अभिजीत, उदित नारायण" इतकेच नव्हे तर तेव्हाचे नवखे "शंकर महादेवन, सोनू निगम, हरिहरन, विनोद राठोड" यांसह अनेक जिनियस गायक "स्पेशल व्होकल", "आलापी, ताना", किंवा कोरस गायकांसोबत सुद्धा चक्क आपलेपणाने वागवत! ही त्यांची मानसिकता अगदी मस्तच होती. स्वागतार्ह होती!) मात्र हेच "खान मस्ताना".. जेव्हा "लव्ह अँड गॉड" (१९८६

प्रदर्शित) या चित्रपटासाठी "अल्लाह तेरे साथ है मौला.." हे गाणे गाण्यासाठी आले होते! ते तेव्हा आजारी आणि विपन्नावस्थेत असतानाही "कोरस" च्या गर्दीत अंग चोरून उभे राहिले होते! रफीजी हे इथे प्रमुख गायक होते. रफींना आपल्यासोबत कोण कोण गाताहेत त्याची आस्थेने विचारपूस करायची सवय होती. "कोरसच्या" गर्दीतल्या "खान मस्ताना" यांना, त्यांनी क्षणार्धात ओळखलं! (आपल्यासारख्या एखाद्या सर्वसामान्य माणसाने, त्या अमुक व्यक्तीची आपल्यासोबतची त्याची, ती तुच्छतेची वागणूक आठवून, त्याच्याकडे साफ दुर्लक्ष केलं असतं. पण..) मात्र रफीजी हे तर साक्षात "खुदा का बंदा" होते! ते त्यांच्याजवळ स्वतःहून गेले. त्यांची आस्थेने विचारपूस केली. गळाभेट करत काही अडचण असल्यास अवश्य सांगा! संपर्कात रहा! असे आपलेपणाने सांगितलं! "खान मस्ताना" यांच्या डोळ्यात अश्रू तरळले नसतील तर नवलच! (रफीजींनी नंतर त्यांना मदतही केली असावी, पण

तो उल्लेख मला तरी सापडला नाही!) अधोरेखित करत ठळकपणे सांगायचं तर यालाच "दैवदुर्विलास" म्हणतात! बुजुर्गांनी सांगून ठेवलंय..! आपल्या जबरदस्त "लोकप्रियतेचा" अभिमान जरूर असावा. त्याने पुढे आपसुकच "बाळसं" सुद्धा येतं, हेही खरं! पण "अभिमानाची" उगीचच "सूज" यायला नको! कारण ती पुढे "माज" या "प्रवृत्तीत" विकसित होते. "माज" आला की "पतन" निश्चितच! हे काय मी सांगू?! (मात्र.. मी "फिल्म इंडस्ट्री" आणि "सिनेसंगीत" विश्वात सुमारे चार दशके कार्यरत असल्याने मी हे माझ्या डोळ्यांनी पाहिलंय व अनुभवलंय, हे मात्र नक्की! याक्षणी "अजीज नाजा" यांची "चढता सूरज धीरे धीरे.." ही अर्थपूर्ण कव्वाली आठवतेय!)

"मोहम्मद रफी" यांच्या संपूर्ण आयुष्यात माझ्या एकंदर माहितीप्रमाणे तरी एक दोनच अप्रिय गोष्टी घडल्या होत्या, त्याने त्यांच्या आयुष्यात काही "धक्कादायक" घडले नसेल, परंतु त्यांच्या "उत्तुंग" भरारीला काहीशी खीळ

बसली होती, हे मात्र नक्की! अतिशय चांगला स्वभाव हा कधी कधी अप्रिय गोष्टी घडवून जातो, हेच खरं! यात "भविष्य", "ज्योतिषशास्त्र" याचा इथे काडीमात्रही संबंध नसतो. "पडोसन" या चित्रपटात एक चरित्र अभिनेता.. "जब जब जो जो होना है, तब तब सो सो होता है!" सतत बोलायचा ना? अगदी तसं! हे थोडसं विस्ताराने सांगतोय! गौर फर्माईयेगा!

चित्रपटातील गीत गाणाऱ्या प्रत्येक गायकाला "गाणे गाण्याचे" अमुक "मानधन" हे "स्टुडिओतच" ("ऑन द स्पॉट") दिले जात असे. ही या क्षेत्रातली पारंपरिक पद्धत होती. मात्र एके दिवशी "लतादीदींनी" अचानक.. "आम्ही गाणी गातो आणि नंतर ती अफाट लोकप्रियता मिळवतात. म्हणून ते गाणे गायलेल्या गायकांना त्याबद्दलचा (अधिकचा) मोबदला "रॉयल्टी" म्हणून चित्रपट निर्मात्यांनी द्यायलाच हवा. ते ऐकून "इंडस्ट्रीतले" अवाक झाले होते. आता "लतादीदींनी" तत्कालीन सोबतच्या सर्व गायक

गायिका यांच्याकडे आपल्या मागणीवर विचार करून "सपोर्ट" द्यावा असे सांगितले. सगळेच मनातून इच्छुक होते असतील सुद्धा! परंतु आपल्याला अगदी आपलेपणाने काम देणा-या संगीतकार, निर्माते वगैरेंबरोबर थेट लढणे तसे शक्य नव्हते! अशी मागणी करणे योग्य नाही, म्हणून "मुकेशजी" आणि "किशोरदा" काहीबाही कारणे देत शांत राहिले. मग दीदी "रफीसाहेबांकडे" आल्या. रफीजी आपल्यासोबत शेकडो गाणी गायलेत व ते सुस्वभावी असल्याने आपल्याला नक्की सपोर्ट करतील याची जणू त्यांना खात्री होती. मात्र त्यांचे ते मत, रफीजींना अजिबात पटले नाही. पण मृदु स्वभावाचे रफीजी शांत राहिले. दीदींनी काही काळानंतर रफींना पुन:पुन्हा विचारले. एखाददुसरा माणूस चिडला असता. पण रफीजी सौम्य आवाजात "दीदींना" समजावत म्हणाले. "तुमच्या या कल्पनेला माझा विरोध नाही, परंतु गाणं गाऊन झाल्यावर आपल्याला, तिथल्यातिथे, आपण सांगतो ते "मानधन"

निर्मातेमंडळी काहीही कुरबुर न करता देतात. मला वाटतं, की ते गाणं ते लोक रेकॉर्डिंग करण्याचा खर्च, ते गाणे "तबकडीवर" प्रकाशित करणे, अमाप पैसे खर्च करून त्याचे चित्रपटासाठी शूटिंग करणे, चित्रपट पूर्ण करण्यापर्यंतचा संपूर्ण खर्च करणे.. ते तो नंतर थेट चित्रपट गृहात प्रदर्शित करण्यापर्यंतची मेहनत, खर्च, मानधन हे सर्व सोपस्कार केल्यानंतर, तो सिनेमा सर्वसामान्य प्रेक्षकांपर्यंत पोहोचतो! पुढे तो चित्रपट "हिट" होईल की "फ्लॉप" हे कुणीच छातीठोकपणे सांगू शकत नाही. अश्या परिस्थितीत आपण "गाणे गायल्यावरची म्हणून अधिकची रक्कम "रॉयल्टी" म्हणून मागणे मला तरी पटत नाही! म्हणून मी शांत आहे. "रफीसाहेब" आपल्याला "सपोर्ट" करत नाहीत, म्हणता "दीदी" खूपच चिडल्या होत्या. दुसऱ्याच दिवशी कुठल्याश्या "रेकॉर्डिंगसाठी" संगीतकार "शंकर-जयकिशन" यांच्याकडून "युगलगीत" गायचा "मॅसेज" आला म्हणतात! दीदींनी "रफीजींबरोबर" मी

यापुढे कधीच "युगलगीत" गाणार नाही, असे स्पष्ट शब्दात कळविले. तो बहुदा "दिल एक मंदिर" हा चित्रपट असावा, असे वाटतेय! कारण या चित्रपटात "दिल एक मंदिर है.." हे गाणं "रफीजी व सुमनताई" यांच्या आवाजात सामोरं येतं!

लतादीदी.. या रफीसाहेबांसोबत कधीच गाणार नाहीत, ही गोष्ट खूपच धक्कादायक होती! (नशीब.. तेव्हां आत्तासारखी "न्यूज चॅनल्स" नव्हती, नाहीतर "आजचा सवाल, बडे मुद्दे,..!" वगैरेसारख्या कार्यक्रमातून काय काय आलं असतं, परमेश्वरालाच माहित!) या बातमीने तेव्हा कार्यरत असणारे सर्वच्या सर्व गीतकार, संगीतकार, संगीत संयोजक, वादक ते थेट "कोरस" गाणाऱ्यांपर्यंतच्या सर्वांनाच ते धक्कादायक होतं! तेव्हा कार्यरत असणाऱ्या "एच. एम. व्ही.", "पॉलिडॉर" या कंपन्या सुद्धा धास्तावणे स्वाभाविक होते. आशाताई होत्या यात शंकाच नाही (अर्थात उषाताई सुद्धा मस्त गायच्या.) परंतु "लतादीदी" यांची जागा कोण घेऊ शकणार होतं!? (याच काळात

गायिका "सुमनताई कल्याणपूर" हा मस्त पर्याय उपलब्ध होता, परंतु त्या "लतादीदींची" जागा भरून काढतील (?), याबाबतीत आमची संपूर्ण "म्युझिक इंडस्ट्री" साशंक होती, हे मात्र नक्कीच! संगीत समीक्षक असणाऱ्या पत्रकारांनी त्या काळात यावर बरंच काही लिहिलं असावं, परंतु आमचं वयोमान पाहता, ते आमच्या तरी खिजगणतीत नाही! अजिबात नाही!) मातृतुल्य आणि आदरणीय "सुमनताई" छानच गायच्या यात काही शंकाच नाही! परंतु त्यांनी सादर केलेल्या "रफीसाहेबांसोबतच्या", सर्वच युगलगीतांमध्ये "लतादीदींचा" निस्सिम चाहता त्यात आपल्या "लतादीदी" नाहीत ही खंत तेव्हाच नाही, तर आजही व्यक्त करताना दिसतो! हे आपण पूर्णतः जाणून आहात! कालाय तस्मै नमः! केवळ रेडिओ आणि त्यावरील गाणी ऐकून, आपली आवडत्या "सिनेसंगीताची" भूक भागवणाऱ्या माझ्या आईच्या वयाच्या सर्वच गृहिणी.. याबाबतीत कित्येकदा, चक्क अधिकारवाणीने बोलताना मी स्वतः प्रत्यक्ष ऐकलेय!

(तुम्हाला माहीतच आहे! कोणताही "रेडिओ" हा कधीच "स्टिरिओफोनिक" नव्हता! "लाकडी कॅबिनेट" असलेले "व्हॉल्वचे" रेडिओ काही प्रमाणात "म्हिदमची डेप्थ" भले द्यायचे, पण "मोनो" प्रकारातील असेच ते सादरीकरण असायचे! ("इक रास्ता है जिंदगी.." हे मूलतः अगदी पूर्णपणे "लेफ्ट-राईट" म्हणजे "किशोरदा" लेफ्ट-ट्रॅकवर आणि "लतादीदी" राईट-ट्रॅकवर अशा स्थितीतले हे गाणं!) लतादीदींच्या आवाजाशिवाय आमच्या पिढीने "रेडिओवर" ऐकलेय! "रेडिओवर" त्याचं "प्रसारण" हे पूर्णतः "मोनो" प्रकारातील असल्याने.. सर्वच गाण्यातील सर्व काही म्हणजे "म्हिदम, म्युझिक, संयोजन, गायकांची गायकी" आणि एकूणच हे सादरीकरण अगदी "अतिसामान्य" याच पठडीतलं होतं! "रफीसाहेब" यांच्यासोबत "लतादीदी" नव्हे, तर "सुमनताई" गाताहेत! हे कित्येकांच्या गावीच नव्हतं! काय सांगू यार!) ही सत्य परिस्थिती आहे! (बाय द वे! योगायोगाने सन्माननीय

"सुमनताई" या जवळजवळ माझ्या "आईच्याच" वयाच्या! मी "ग्रँट रोड" विभागातील ज्या "रॉबर्ट मनी टेक्निकल शाळेत" शिकायचो, त्याच शाळेच्या समोरील "मॉडेल हाऊस" मध्ये त्या रहायच्या! "सुमन हेमाडी" हे त्यांचे मूळ नाव! सुप्रसिद्ध गायिका "श्यामा चित्तार" या त्यांच्या कनिष्ठ भगिनी! याच कॉलनीमध्ये सुप्रसिद्ध निवेदिका "भक्ती बर्वे" आणि "शफी इनामदार" रहायचे! असो!)

१९६१ या वर्षात प्रदर्शित झालेल्या सिनेमांची नावे पाहता.. "ससुराल", "असली नकली", "दिल तेरा दिवाना", "प्रोफेसर" असे अनेक सिनेमे आहेत. गाणी आधी रेकॉर्ड होऊन नंतर पडदा पाहिलेले "एक दिल सौ

अफसाने", "आई मिलन की बेला", "हमराही" या चित्रपटांमध्ये "लता-रफी" अशी युगलगीते सापडतात. परंतु माझ्या वाचनात आल्याप्रमाणे "लता-रफी" हे कॉंबिनेशन "जंगली" मध्ये शेवटचं आढळल्याचे लिहिलं गेलंय. (सर्व "लिंक्स" नक्की पहा. अभ्यासा!)

आता झालं असं की, लतादीदी व रफी साहेबांनी एकत्र गाणं काय संपूर्णपणे बंद केलं त्याचे पडसाद सर्वत्र उमटू लागले. संगीतकारांमध्ये सुद्धा निराशा होती. मात्र उघडपणे बोलण्याचे ते सर्वजण टाळत असत, हे नक्की! (कारण दोघांबद्दल सर्वांच्या मनात अतिशय आदर होता.) लतादीदी "सोलो" गाणी गायला मात्र यायच्या हं! सुमनताई छानच गायच्या यात शंकाच नाही. पण.. कुठेतरी काहीतरी हरवल्यासारखं वाटत होतं, हे निश्चित! त्या काळातले लता -रफी यांच्या "युगलगीतांवर" जीव ओवाळून टाकणारे "श्रोते/रसिक" मात्र मनातून आक्रंदन करत होते. कुणीतरी पुढाकार घ्यायला हवा होता, पण हाय!

राज कपूर साहेबांनी, शंकर जयकिशन यांच्यासोबत "संगम" (१९६४) सिनेमाची गाणी आकाराला आणायला

घेतली. "हर दिल जो प्यार करेगा.." हे गाणं बनवायला घेताच त्यात रफी, मुकेश होतेच. पण स्त्री गायिकेसाठी कोण!? "मला लतादीदीच हव्यात!" असे राज कपूरजी हट्टून बसले. त्यांनी दीदींशी थेट संपर्क साधला. परंतु हाती निराशाच आली. "मी त्या गाण्यात असेन, पण "ते" नकोत, हे नक्की!.." शेवटी महेंद्र कपूरजी यांनी ते कडवे गायले. या सिनेमाच्या गाण्यांची "रेकॉर्ड" प्रकाशित झाली.. आणि नंतर चित्रपट प्रदर्शित झाला. अचानक एके दिवशी दीदींनी राजसाहेबांना फोन केला. राजसाहेबांना वाटलं, की त्या "गाणे गायले नाही, याचं वाईट वाटतं.." वगैरे बोलतील!

पण कसचं काय! दीदींनी राजसाहेबांना "मैं का करू राम.." या गाण्याच्या चित्रिकरणाबाबत तीव्रपणे नापसंती दर्शवली. राजसाहेबांनी मनोमन कपाळावर हात मारून घेतला असेल!

एक वर्ष उलटलं, आता तरी "अबोला" संपेल अशी भोळी आशा करत लोक त्या काळात "रफी-सुमन" हे "कॉंबिनेशन" स्वीकारत राहिले. पण नाही! आणखी काळ जावा लागेल, असं बरेच समीक्षक आपल्या लेखामधून मांडत होते, असे बुजुर्ग पत्रकार सांगायचे.

बुजुर्गांची एक आठवण सांगायची तर.."सांज और सवेरा" (१९६४) प्रदर्शित झाला.. "यही है वो सांज और सवेरा.." आणि "अजहुन आये बालमा.." ही मस्त गाणी रेडिओवर ऐकायला मिळताच लोक सुखावले होते! रेडिओचा "साऊंड" तो काय! "मोनो" आणि काहीसा "चिरका"! निवेदनातून गायकांची नावे ऐकताच, पचका झाला की हो! ती गाणी "सुमनताईंनी" गायलेली आहेत

म्हणता भ्रमनिरास झाला.

दिवसांमागून दिवस जात होते पण अबोला संपायचे नावच घेत नव्हता. (रफीजी व लतादीदी.. शेवटी कलावंतच ते! मनाने अत्यंत हळवे! पण त्यांनी.. या काळात कोणत्याही ठिकाणी, समारंभ किंवा तत्सम ठिकाणी एकमेकांविरुद्ध कधीही द्वेष, राग, आगपाखड, बदनामी केली नाही, ही विशेषच! (आजच्या राजकारणातले लोक तर भयंकरच! असो!)

मग हा "अबोला" संपला कधी असेल. त्यासाठी १९६७ हे साल उजाडावं लागलं. निमित्त होतं "ज्वेल थीफ" च्या गाण्यांच्या रेकॉर्डिंगचं! संगीतकार सचिनदा यांनी पुढाकार घेतला होता. लतादीदी यांना आपल्या "लेकीसारखी" मानत असल्याने, त्यांनी दोघांना समोरासमोर बसवून समेट घडवून आणला आणि ती कोंडी फुटली! हे निश्चित! मग पहिलं गाणं कोणतं असेल बरं..? "दिल पुकारे आ रे आ रे.."! व्वा!

आपल्या "म्युझिक इंडस्ट्रीमध्ये" वेगळं काही घडलं की आपसुकच "गीतकार/शायर/कवी" यांना जणू" प्रसववेदना सुरू होतात! तुम्हाला आठवतंय ना? "बदन पे सितारे लपेटे हुए.." हे गाणं कसं सुचलं..असेल बरं? तर एका समारंभात तत्कालीन (कुणीतरी) ग्लॅमरस अभिनेत्री "आरसे" लावलेली मस्त पांढरी साडी नेसून आली होती! ओ माय गॉड! लागलीच "हसरत जयपुरी" यांना हे गाणं सुचलं. अशी अनेक उदाहरणे आहेत. हल्लीचंच (अगदी माझ्यासमोर घडलेलं..) एक धम्माल उदाहरण सांगायचं तर "श्रवण सिन्हा" नामक तरुण (जो नुकताच परराज्यातून आलेला!) तो आमच्या "व्हीनस" मध्ये येऊन आपल्याला सुचलेली "गाणी/शायरी" वगैरे आमच्या "बॉसला" ऐकवायचा. बॉस आपलेपणाने ऐकत! ते "काव्यवाचन" डिस्चार्ज करून झालं की आम्हाला आपबिती सांगायचा. त्याला मी "विरार" मध्ये (त्याच्या भाषेत "बिरार"!) एक छोटीशी रूम मिळवून दिलेली! आता "श्रवण".. मुंबईच्या

लोकलमधून प्रवास करू लागला! दोनच दिवसात तो धावत पळत आमच्या स्टुडिओत दाखल झाला. त्याच्या सुदैवाने माझे, संगीताचा कान असलेले, माझे "बॉस" (सन्मा. चंपकजी जैनसाहेब) सुद्धा तिथे उपस्थित होते. त्याने असह्य प्रसववेदना होत असल्यागत आम्हाला गाणं ऐकवायला घेतलं. अगदी सुचलेल्या एक "रफ" अशा चालीसकट! त्याने सहजच लोकल ट्रेनमधली एक जाहिरात वाचलेली. त्याला त्यावरून एक काव्य सुचलेलं. "अगर आपको कुत्ता काँटे, और आप दवाई न ले तो वो बिमारी "जानलेवा" हो सकती है! झालं! श्रवणला परवलीचा शब्द सापडला. मग त्याने त्यावर एक गाणं लिहिलं! "जानलेवा जानलेवा.."!!! बस्स!! त्याच्या सुदैवाने तिथे "मोक्ष" (२००१) या सिनेमाचे निर्माते " अशोक मेहताजी" उपस्थित होते. झालं! त्यांना त्या काव्यात एक "स्पार्क" जाणवला. त्यांनी स्टुडिओमध्ये कार्यरत असणाऱ्या "जिनियस संगीतकार राजेश रोशन" यांना बाहेर येण्यासाठी सांगावा

धाडला. आता माझे बॉस आणि मी, क्षणार्धात भांबवलो. कारण "राजेश रोशनजी" यांना सहजच "फ्रेममध्ये" पकडणे तसे कठीणच आहे/असायचे. पण गीतकाराचे सुदैव पहा! त्यांनाही "त्या" वेगळ्या व पूर्णतः विचित्र शब्दरचनेत "स्पार्क" सापडला! त्यांनी ते आपलेपणाने स्वीकारलं! आणि त्या श्रवणला सीटिंगसाठी बोलावलं. जे गाणं झालं, जे तुमच्यासमोर आहे! अशी अनेक उदाहरणे आहेत हो! जो स्वतंत्र पुस्तकाचा विषय आहे! गाणी कधी सुचतात, आकाराला येतात, जे "याची देही, याची डोळा" पाहिलं, त्याची ही दास्तान! तूर्त एवढंच! तुम्ही म्हणाल.. "बाय द वे" हे नमनाला घडाभर तेल ओतण्याचे कारण काय!? तर "लतादीदी आणि रफीजी" यांचा "अबोला" असण्याच्या काळात अनेक गीतकारांनी आपापली प्रतिभा पणाला लावत अनेक "गाणी" लिहिली होती. म्हणजेच "लतादीदी आणि रफीसाहेब" यांचा अबोला त्यांच्या सुद्धा (आणि अनेकांना) थेट जिव्हारी लागलेला, हे मात्र निश्चित!

या त्या (म्हणजे रफी-लता) या दोघांच्या "अबोला" असलेल्या "त्या" काळात.. गीतकारांनी काय काय लिहिलेलं, हे पाहून सामान्य रसिक थक्कच होईल! ती नेमकी कोणती गाणी असतील बरं! मी सहजच अभ्यासल्याप्रमाणे "मेरे दुश्मन, तू मेरी दोस्ती को तरसे.." (मेरे हमदम मेरे दोस्त) तर नक्कीच होतं! (एखादा प्रियकर तिच्या पूर्वाश्रमीच्या प्रेयसीकडून झिडकावला गेल्याने तो भले अतिशय दुःखी, हताश व निराश असेल, ("दिल जो न कह सका.." आठवा!) परंतु तो एकेकाळच्या आपल्या "प्रेयसीला" इतके जिव्हारी लागणारे बोलेल, हे मात्र अजिबात पटत नाही! (चित्रपटात गीतकाराची "अबोला" विषयीची ती मुख्य "थॉट" त्या निर्माण केलेल्या "सिट्युएशन" मध्ये "फिट" करण्यासाठी भले त्यांनी ते काहीसं "सौम्य" केले असेल!) पण समझ जाते है यार!

आणखी एक उदाहरण देतोय! "रफीजी व लतादीदी" यांचा "सलोखा" झाला म्हणा किंवा

"दिलजमाई" झाली म्हणा... यावर सुद्धा अनेक गाणी सापडतात! तुम्ही "तुम्हारी नजर, क्यो खफा हो गयी.." हे "संगीतकार रवी" यांच्या संगीतातले सर्वांगसुंदर "युगलगीत" (चित्रपट "दो कलियाँ") नक्की ऐका! आणि समजून जा! (या गीताचे वेगळ्या चालीत "सॅड व्हर्जन" सुद्धा आहे, बरं!!) शायर "साहिरजींनी" हे गाणं आपल्या चित्रपटात एखादी "सिच्युएशन" निर्माण करत टाकता येईल का असं "रवी" यांना आधी विचारलेलं. रवींनी मग दिग्दर्शक/लेखक यांच्याशी चर्चा करून गाणं ते काहीसं "लव्ह साँग" या जॉनरचं होईल यात लक्ष घातलं! गाणं छानच आहे, यात शंकाच नाही!

आणखी एक आठवण सांगायची तर लता-रफी यांचा "अबोला" असल्याचा काळात.. रोशनजींच्या संगीतात "रहे न रहे हम.." (ममता १९६६) हे गाणं सामोरं आलं! "सोलो" लतादीदी यांनी गायलंय तर "युगलगीत" अबोला असल्याने रफीजी आणि सुमनताई होते!

मोहम्मद रफी यांनी आपल्या संगीतमय कारकिर्दीत केवळ भारतातच नव्हे, तर परदेशातही आपली गाणी आणि "लाइव्ह कॉन्सर्टस"द्वारे प्रचंड लोकप्रियता मिळवली होती. त्यांच्या परदेश वारीबद्दलची काही वैशिष्ट्ये सागायची तर.. रफी साहेबांनी अमेरिका, युनायटेड किंगडम (यूके), कॅनडा आणि पूर्व आफ्रिकेसह अनेक देशांमध्ये लाईव्ह परफॉर्मन्स दिले आहेत. त्यांचे चाहते केवळ भारतातच नाहीत, तर जगभरातील भारतीय उपखंडातील लोकांमध्ये (अनिवासी भारतीय) ते खूप लोकप्रिय होते. त्यांच्या गाण्यांनी परदेशातील संगीताच्या मैफिली गाजल्या होत्या! साठच्या दशकात, रफी हे परदेशात लाईव्ह कॉन्सर्ट करणाऱ्या पहिल्या काही भारतीय पार्श्वगायकांपैकी एक होते. रफी साहेब जेव्हा परदेश दौऱ्यावर असायचे, तेव्हाही शम्मी कपूर त्यांच्याशिवाय गाणे रेकॉर्ड करत नसत. एकदा रफी साहेब युरोप दौऱ्यावर असताना शम्मी कपूरने त्यांना फोन करून

गाण्याबद्दलची उत्सुकता सांगितली होती. त्यांच्या आवाजाची जादू जगभरातील प्रेक्षकांना मंत्रमुग्ध करणारी होती, ज्यामुळे त्यांचे परदेश दौरे नेहमीच यशस्वी होत असत. मोहम्मद रफी यांनी १९६९ मध्ये पवित्र हज यात्रा सहकुटुंब पूर्ण केली होती. रफी साहेबांच्या हज यात्रेविषयीची अधिक सांगायचं तर या यात्रेदरम्यान त्यांच्यासोबत पाकिस्तानचे प्रसिद्ध गायक मसूद राणा हे देखील होते. खरं तर, रफी साहेबांचा सुरुवातीला मक्का-मदीनाला जाण्याचा कोणताही त्वरित बेत नव्हता. परंतु, काही कौटुंबिक व आध्यात्मिक कारणांमुळे त्यांनी हज यात्रेला जाण्याचा निर्णय घेतला. ते अतिशय धर्माभिमानी होते वा इस्लाम धर्मातील पवित्र स्थळांना भेट देण्याची त्यांची सुप्त इच्छा होती.

असे म्हटले जाते की, हज यात्रेच्या वेळी त्यांना मक्का (मदीना) येथे "अजान" (नमाजसाठी बोलावणे) देण्याची संधी मिळावी, म्हणून तिथल्या कमिटीकडे विनंती

केली होती. एका सामान्य यात्रेकरूला तिथे अजान देण्याची अजिबात परवानगी नसते, परंतु रफी साहेबांच्या

धार्मिक वृत्तीमुळे आणि त्यांच्या चाहत्यांच्या विनंतीवरून, तिथल्या मौलवींनी त्यांना विशेष परवानगी दिली होती. हज कमिटीने आपला निर्णय बदलला होता, ज्यामुळे रफी साहेब मक्केमध्ये "अजान" देऊ शकले. मोहम्मद रफी हे अत्यंत धार्मिक प्रवृत्तीचे होते आणि त्यांनी आपल्या आयुष्यात हा पवित्र प्रवास केला होता! या "अजान" आणि "या नबी सलाम.." (नात) एकदा तरी अवश्य ऐका!

असं समजतं की हजवरून परतल्यानंतर, रफीजी अध्यात्माकडे अधिक वळले होते. काही मौलवींनी म्हणे

त्यांना उपदेशाचे डोस पाजत संगीतक्षेत्रातील कामामुळे 'गुनाह' (पाप) होत असल्याचे सांगितले होते। या आध्यात्मिक मानसिकतेमुळे, त्यांनी गाणे पूर्णपणे सोडून देण्याचा निर्णय घेतला होता म्हणतात! अशी चर्चा होती की काही धार्मिक मार्गदर्शकांनी (मौलवी) त्यांना संगीतापासून दूर राहण्याचा सल्ला सुद्धा दिला होता, ज्यामुळे त्यांनी गाणे सोडण्याचा निर्णय घेतला होता. मात्र सत्य काय होते? हे रफी साहेबांचे सुपुत्र "शाहीद रफी" यांनी स्पष्ट केले होते की, त्यांनी गायन पूर्णपणे सोडले नव्हते, परंतु त्या काळात ते थोडे काळ अस्वस्थ होते आणि गाण्यांचे प्रमाण कमी केले होते! तरी संगीतावरील त्यांचे प्रेम आणि चाहत्यांची इच्छाशक्ती यांमुळे त्यांनी पुन्हा गाण्यास सुरुवात केली. संगीतकार व निर्मात्यांनी त्यांना समजावल्यानंतर त्यांनी आपली गायकी सुरू ठेवली. त्यांच्या कुटुंबातील सूत्रांनुसार, त्यांनी परंपरेनुसार धर्म आणि संगीत यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न केला. नौशादजी सारख्या

जवळच्या संगीतकारांच्या समजुतीनंतर त्यांनी पुन्हा गायनाला सुरुवात केली होती, हे निश्चित! आणि यानंतर त्यांनी अनेक सुपरहिट गाणी दिली. हज यात्रेनंतर, लोक रफी साहेबांचा आदर 'हाजी' म्हणून करू लागले होते आणि त्यांच्याकडे एक धार्मिक व सात्विक व्यक्ती म्हणून पाहिले जाऊ लागले होते.

मोहम्मद रफी यांच्या "सेकंड इनिंग" बद्दल बोलायचं तर, काही खास आठवणी उद्धृत करतोय. ज्यातून बरंच काही गवसेल, असं मनापासून वाटतं!

किशोर कुमार आणि मोहम्मद रफी यांना पुरूष गायकात अफाट लोकप्रियता लाभली, हे तुम्ही जाणताच. मुकेश हे यातले तिसरे नाव. त्यांचीही जन्मशताब्दी आहे! दुर्दैवाने तिघेही साठीच्या आतच गेले! (आत्ता या क्षणी माझ्या, म्हणजे पासष्टीपार असलेल्या माझ्या पिढीला "तलत महमूद, हेमंतदा तसेच मन्नादासुद्धा" आजही अत्यंत आवडतात! सी. रामचंद्र यांचे संगीतच नव्हे तर त्यांची

गायकीसुद्धा आवडायची! खरंतर "सैगल, सी. एच. आत्मा ते थेट सुबीर सेन सारखे गायक" सुद्धा आम्हाला आवडायचे. त्यांची गाणी आम्ही आजही फुरसदीत ऐकतोच ऐकतो! स्पष्ट सांगायचं तर आमच्यासाठी महेंद्र कपूर वगैरे अनेक पुरुष गायक हे आमच्यासाठी खरंच त्यानंतरच्या पिढीतले, हे सत्य आम्ही स्वीकारलेलं! यासाठी आम्हाला अगदी लहानपणापासून बाळकडू कुणी दिले असेल, तर "रेडिओ सिलोनने"! तुमचा विश्वास बसणार नाही, पण आमच्या पिढीतले जवळजवळ सर्वच जण "बिनाका गीतमाला"चे "यू-ट्यूब" वर उपलब्ध असलेले जवळजवळ सर्वच "कलेक्शन" आजही आपलेपणाने ऐकतो! आमच्या आजच्या या वयात सकाळी सुमारे चार किलोमीटर "वॉक" करून आल्यावर, पहिलं काम काय असतं? आपले "हार्ट-बिट्स" नॉर्मल करण्यासाठी काय करायचे? तर आम्ही आजही जुनी गाणी ऐकूनच ताजेतवाने होत असतो! ती जुनी गाणी पुन:पुन्हा ऐकून आपल्या मनाला पुन्हा एकदा

ताजेतवाने करणे, ही आमच्या पिढीला चक्क उपचारक अशी "संजीवनी बुटी" वाटते! यातच सर्वकाही आले!)

मोहम्मद रफी यांची "आराधना" नंतरची काही वर्षे खडतर गेली! पण धर्मेंद्रने पसंती दिल्यानेच असेल "आज मौसम..." या गाण्याने रफी आणि धर्मेंद्र परतले! धर्मेंद्रने त्या वर्षी नऊ हिट सिनेमे दिले होते, ज्यात चार चित्रपटात धर्मेंद्राने चोराची भूमिका केली होती. असे म्हणतात की अमिताभ बच्चन स्टार बनण्यापूर्वी "लोफर", "जुगनू" मुळे राजेश खन्नाचे स्टारडम धोक्यात आले होते! आणि "जंजीर"ने त्यावर तर जबरदस्त शिक्कामोर्तब केले. याच दरम्यान "लैला मजनू" सुपरहीट झाला, त्यातली सर्वच गाणी सुपरहीट झाली आणि "लोफर"मुळे परतलेल्या रफींची सेकंड इनिंग मस्तच सुरू झाली. ती नंतर बहरतच चालली होती! "पर्दा है पर्दा..", "शिरडीवाले साईबाबा.." अशी आधुनिक हिरोंना साजेशी अशी गाणी मोहम्मद रफी देऊ लागले. पूर्वीची मोहम्मद रफीची गाणी आणि या अमुक

काळातली ही गाणी पाहिली तर एकूणच संगीतालाच आव्हानात्मक दिवस सुरू झाले होते, असे म्हणता येईल! कारण चित्रपट संगीताने घेतलेली ही मस्त अंगडाई माझ्या पिढीने तरी अत्यंत आपलेपणाने स्वीकारली होती!! त्या काळात अचानक आलेल्या हाणामारीच्या सिनेमातल्या देमार हिरोंना, का? कुणास ठाऊक, "किशोर कुमार"च हा "मॅनली" आवाज वाटू लागला होता! यातूनच "हाथ की सफाई"च्या वेळी नायक विनोद खन्नाला "किशोरचा आवाज" त्याला न देता रणधीर कपूरला दिल्याचा राग आला होता! आठवा! "पिनेवालोंको.."! विनोद खन्ना सीनीअर असला तरी रणधीर कपूर हिरो म्हणून त्याला चक्क "सिनीअर" होता. त्याच्या नावावर "जवानी दिवानी" सारखे बरेच चित्रपट हिट होते. तो राज कपूरचा मुलगा होता. साहजिकच त्याची स्टार व्हॅल्यू त्या वेळी विनोद खन्ना पेक्षा जास्त होती! विनोद खन्ना नुकताच काळे धंदे सोडून सभ्य व्यवसाय करायला लागला होता. अर्थातच पडद्यावर!

त्यामुळे त्या वेळचा स्टार गायक किशोर कुमार रणधीरच्या वाटेला गेला. रणधीर आरडी बर्मन मैत्री जगजाहीर होती आणि आरडी किशोरकुमार मैत्रीही. त्यामुळे रणधीर कपूर किशोर कुमार हे काँबो बनलेलं होतं.

काहीही असो! विनोद खन्नाची समजूत स्वतः प्रकाश मेहरांनी काढली. जर गाणं आवडलं नाही तर पुन्हा रेकॉर्डिंग करूयात! असं आश्वासन पण दिलं! विनोद खन्नाने नाईलाजाने होकार दिला. रेकॉर्डिंगला रफीला बोलवलं! रफीसाहेबांनी विनोद खन्नाशी गप्पा मारल्या. त्याचं व्यक्तीमत्व लक्षात आलं आणि त्याला अनुसरून त्यांनी आपल्या आवाजाचा टोन निश्चित केला. ते गाणं रेकॉर्ड झाल्यावर प्रकाश मेहरा यांनी ऐकलं मात्र, विनोद खन्नाला ते बोलावून घेऊन आले. त्याला गाणं ऐकवलं.. विनोद खन्नाचा रूसवा कुठल्या कुठे पळून गेला. चाणाक्ष वाचकांनी बरोब्बर ओळखलं असेल!. ते गाणं म्हणजे.. "वादा कर ले साजना..."**.** प्रकाश मेहारांच्या "हाथ की

सफाई" या सुपरहीट चित्रपटाचे सर्वात हिट गाणे!

या काळात रफीने ऋषी कपूरसाठी पण हिट गाणी दिली. "कुर्बानी" मधे पुन्हा विनोद खन्ना साठी कुणाचा आवाज द्यायचा हा प्रश्न आला. कारण दुसरा हिरो खुद्द फिरोज खान! फिरोज खानने यापूर्वी किशोर कुमार आणि मुकेश असे दोन्ही आवाज वापरले होते. पण या चित्रपटात संगीतकाराने ठरवलं की फिरोज खानला रफीचा आवाज वापरायचा. "क्या देखते हो, सूरत तुम्हारी.." हे गाणं होतं. ज्या माणसाने आधुनिक पार्श्वगायनात लटके झटके, निसरडे स्वर आणले, आणले तो स्वतः समोर असताना, कलाकारी आशा भोसलेने केली पण रफीने गाणे एकदम शिस्तीत म्हटले. कुठेच वरचे सूर नाहीत, व्हेरीएशन्स नाहीत, झटके नाहीत. संगीतकाराला कळेना. तेव्हां रफीसाहेबांनी सांगितलं कि शूटींग होऊन जाऊ दे, मग बोलू. फिरोज खानवर गाणं चित्रीत झालं आणि मग सर्वांच्याच लक्षात आलं. फिरोज खानची सवय होती की तो

हॉलिवूडच्या नायकांप्रमाणे तोंडातल्या तोंडात पुटपुटायचा. तो क्वचितच जबडा पूर्ण उघडायचा. गाण्यासाठी लिप-सिंकिंग करतानाही त्याची हीच सवय होती. त्यामुळे गायकाने त्याप्रमाणे गाणं गायलं. झीनत अमान सुद्धा फार काही वेगळं करत नव्हती. पण किमान तिचा चेहरा बोलका असल्याने आशाने त्यात माफक कलाकारी केली. पण तत्कालिन "टिपिकल" हॉट कपड्यातली "झीनत अमान" आपला नायक असलेल्या "फिरोज खान" याला.. "क्या देखते हो?.." असं विचारते आणि तो साळसूदपणे "सूरत तुम्हारी.." असे उत्तर देतो, यासारखा दुसरा विनोद नाही!

तर.. अशा प्रकारे रफींनी पुन्हा गायला सुरुवात केली होती. १९७८ च्या "सरगम" (ऋषी कपूर-जया प्रदा) पासूनच "रफींनी" नवा डाव मांडला. आपण त्यांच्या

पुनरागमनाने आनंदलो होतो. मात्र १९८० मध्ये "कुर्बानी" मधून "डिस्को" आला ("आप जैसा कोई मेरे जिंदगी.." गायिका : नाझिया हसन, संगीत : बिद्दु) आणि नंतरच्या काळातील "डिस्को सेन्सेशन"च्या वावटळीमुळे "रफीसाहेब" काहीसे घुसमटले होते. "भप्पी लाहिरी" यांच्या संगीतात सुद्धा गायला लागल्याने ते मनोमन हैराण झाले नसतील तर नवलच! अर्थात त्या काळात एकीकडे चांगली गाणी सुद्धा मिळत होती.

"आशा" (जीतेंद्र, रीना रॉय), "दोस्ताना" (अमिताभ बच्चन, शत्रुघ्न सिन्हा), "शान" (अमिताभ बच्चन, शशि कपूर), "कर्ज़" (ऋषि कपूर, टीना मुनीम), "द बर्निंग ट्रेन" (धर्मेंद्र, विनोद खन्ना), "जुदाई" (जीतेंद्र) अशा चित्रपटातील रफींची मस्त गाणी होती. नौशादजी, अनिल विश्वास, कल्याणजी - आनंदजी वगैरे संगीतकार भेटताच ते आपलं मन मोकळं करायचे. ते एकमेकांना धीर द्यायचे, इतकंच!

मोहम्मद रफी यांनी "इंग्लिश" गाणी सुद्धा गायली

होती. मोहम्मद रफी यांनी ही इंग्रजी गाणी १९७० च्या दशकाच्या सुरुवातीला (सुमारे १९७०) रेकॉर्ड केली होती. रफी यांनी गायलेल्या या इंग्रजी गाण्यांबाबतची महत्त्वाची माहिती सांगायची तर.. ती कुठे रेकॉर्ड केली? तर ही गाणी मुंबईत (तत्कालीन "बॉम्बे") रेकॉर्ड करण्यात आली होती. त्यांनी प्रामुख्याने दोन इंग्रजी गाणी गायली. (१.) "ऑल्दो वुई हेल फ्रॉम डिफरंट.." या गाण्याची चाल 'सूरज' चित्रपटातल्या 'बहारों फूल बरसाओ..' या हिंदी गाण्यावर आधारित होती. आणि (२.) "द शी आय लव्ह इज.." या गाण्याची चाल 'गुमनाम' चित्रपटातील 'हम काले हैं तो क्या हुआ..' या गाण्यावर आधारित होती. ("लिंक" पहा ही गाणी प्रसिद्ध संगीतकार जोडी शंकर-जयकिशन यांनी संगीतबद्ध केली होती. आणि गीतकार होते, सुप्रसिद्ध लेखक आणि कवी हरिंद्रनाथ चट्टोपाध्याय! काही ठिकाणी असा दावा केला जातो की त्यांनी ही गाणी १९७० मध्ये संयुक्त राष्ट्रांमध्ये (UN) गायली होती, परंतु या दाव्याला

कोणताही ठोस ऐतिहासिक आधार नाही, हे मात्र नक्की!

गुरुवार, दि. ३० जुलै, १९८० एवढी मनहूस संध्याकाळ मी माझ्या हयातीतच नव्हे तर शेकडो/हजारो रसिकांच्या आयुष्यात कधीच आली नसावी. नेहमीप्रमाणे वामकुक्षीनंतर चहापान करत काही वेळ "रेडिओ" ऐकायचा, आणि अभ्यासाला बसायच! हा आमचा नेहमीचा दिनक्रम! "गाणी" ऐकून झाल्यानंतर "रेडिओ" बंद करून बाहेर पाहिलं तर काय! सगळीकडे जणू उदास माहौल होता. जुलै महिना, म्हणजे "पावसाळ्यात" कोणत्याही क्षणी अंधारून येतं हे जरी खरं असले तरी, या दिवसाची गोष्ट काहीशी उदासवाणी होती, ही मात्र नक्की! बाहेर पाहिलं तर वातावरण "ग्रहण" लागल्यागत "काळठिक्कर" पडलं होतं! असे असूनही "उष्णता" होती आणि त्यामुळे आर्द्रता वगैरेमुळे चक्क ग्लानी येत होती. ३१ जुलै रोजी संध्याकाळी चारच्या दरम्यान कुणीतरी "मोहम्मद रफी साहेब" यांना "हार्ट अटॅक" आल्याचे सांगितलं! खूपच

धक्कादायक आणि हादरवून टाकणारं होतं ते! असा दिवस कोणाच्याही आयुष्यात पुन्हा येऊ नये, हीच परमेश्वरचरणी प्रार्थना! तो दिवस जणू रफीजींसाठी अतिशय वाईट होता. सकाळी ते वांद्याच्या "मेहबूब रेकॉर्डिंग स्टुडिओ" मध्ये ते "लक्ष्मीकांत-प्यारेलाल" यांच्या संगीतातील "आसपास" या चित्रपटाचे गीत गाण्यासाठी पोहोचले होते. ते गाणं होतं. "शाम फिर क्यूँ उदास है दोस्त..तू कहीं आस पास है दोस्त" हे गाणे रेकॉर्ड केले. गाणे रेकॉर्ड करत असताना त्यांना छातीत तीव्र वेदना होत होत्या, असे असूनही त्यांनी काम पूर्ण केले. "रमजानचा" महिना आणि ते "रोजा" पाळत असल्याने त्यांना थकवा हा होताच. पण त्यांनी तशाही परिस्थितीत गाणे मनापासून गायले. निर्मात्यांना निराश केले नाही! त्यानंतर दुपारी ते घरी आले. घरी पोहोचून निवांत बसणार तोच त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागलं. त्यांनी पत्नीला "बिल्कीस बानो" यांना बोलावून आपल्याला अतिशय त्रास होतोय हे सांगितलं. "बिल्कीस बानो" यांनी

लागलीच "डॉक्टरांना" बोलावून घेतलं. त्यांनी प्राथमिक उपचार करून "यांना हॉस्पिटल मध्ये दाखल करावे!" असे सांगितले. त्यानंतर त्यांना माहिमच्या "नॅशनल हॉस्पिटलमध्ये" नेण्यात आले. तिथे त्यांच्यासाठी "पेस-मेकर" उपलब्ध नसल्याने त्यांना "बॉम्बे हॉस्पिटल" मध्ये हलवताना दुसरा झटका आला! "बॉम्बे हॉस्पिटलमध्ये" उपचार घेताना सर्वकाही ठीक होईल असे वाटत असतानाच रात्री सुमारे सव्वादहाच्या दरम्यान त्यांची "प्राणज्योत" मालवली. एक झंझावात संपला! एक पर्व संपले! ३१ जुलैच्या त्या "संध्याकाळची".. आम्हा "फॅन्सची" नेमकी मानसिकता सांगायची तर.. त्या "संध्याकाळची" म्हणजे मोहम्मद रफीसाहेबांचे "डायहार्ड फॅन" असणाऱ्यांच्या आमच्यासारख्या सामान्यांचा जीव मात्र तीळतीळ तुटत होता. इतक्यात नरेंद्रने "त्यांना बहुतेक "बॉम्बे हॉस्पिटल"ला नेले आहे..", हे "विद्यादादाने" सांगितल्याची बातमी दिली. ती बातमी नक्कीच

"ऑथेंटिक" असेल असे गृहीत धरून.. आम्ही बालमित्रांनी "बॉम्बे हॉस्पिटल" कडे जायची तयारी केली. आमची मुंबई सेंट्रलची "बी. आय. टी. चाळ" ते "बॉम्बे हॉस्पिटल" हे अंतर तसे काही खूप मोठे नव्हते! परंतु आम्ही "वीसेक" वर्षाचे तरुण, म्हणजे आमच्या पालकांच्या भाषेत "बच्चेच"! त्यांनी याबाबतीत कडाडून विरोध केला! का? ते फक्त "ॲडमिट" आहेत ना? ती खूप मोठी आदरणीय व्यक्ती आहे! "खुदा का बंदा!" म्हणतात त्यांना! अशी व्यक्ती अकाली जाणे तर अजिबात शक्यच नाही. कृपया उतावळे होऊ नका! शांत रहा! उद्या ते बरे झाल्याची आनंददायक बातमी येईल! आपल्या सर्वांच्या "देवावर विश्वास असल्याच्या भावनेप्रमाणे" ते नक्की बरे होतील! याक्षणी "हॉस्पिटलच्या" त्या विभागात उगीचच प्रचंड गर्दी उसळली असेल. तुम्ही त्यात भरडून जाल. तिथे गडबड किंवा गोंधळ नक्कीच होऊ शकतो! म्हणून शांत रहा! देवावर विश्वास ठेवूया!.." असे आपलेपणाने सांगितले गेले!

आम्ही स्वतःशीच चरफडत शांत राहिलो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे, ही "ब्रेकिंग न्यूज" म्हणावी अशी बातमी! पण का कुणास ठाऊक, त्या क्षणी रेडिओवर ती बातमी आलीच नव्हती. आत्ता सध्या जसे "हेल्थ अपडेट" वगैरे प्रकार येतात ना? तसे तर अजिबात नव्हतेच! कमाल आहे यार! शेवटी रात्री "अकराच्या" सुमारास सुप्रसिद्ध गायक "मोहम्मद रफी" पैगंबरवासी झाल्याची त्रोटक माहिती रेडिओवरून प्रसारित झाली. अतिशय वेदनादायक क्षण होता तो! एक जबरदस्त "जिनियस" असा थोर गायक आपल्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी "पैगंबरवासी" व्हावा, ही अतिशय वाईट बातमी होती. संगीतक्षेत्रच नव्हे तर त्यांचे "निस्सिम चाहते" मुळापासून हादरलेले. ही बातमी दि. १ ऑगस्टच्या सर्वच प्रमुख वृत्तपत्रांमध्ये आली होती. ती बातमी वाचून प्रत्येक रसिक मनापासून हळहळलेला होता. प्रत्येकाच्या मनावर आघात झाला होता, हे मात्र निश्चित!

मोहम्मद रफी "हॉस्पिटलमध्ये" ऍडमिट असताना,

जायला मिळाले नाही. परंतु त्यांचा "जनाजा" तरी पाहून "अंतिम दर्शन" घडावे अशा मनःस्थितीत आम्ही होतो. हाजी अली स्थित आमच्या "लाला कॉलेज" मध्ये पहिल्या तीन लेक्चर्स नंतर आम्ही निघालो. रफिजींच्या वांद्यातील घराकडे पोहोचलो! तोबा गर्दी होती. दुपारी बाराच्या ठोक्याला "जनाजा" उचलला गेला. वांद्याच्या २८ व्या रस्त्यावरून "वॉटर फिल्ड रोड", ते नंतर "न्यू टॉकीज" हा "जनाजा" जुहू-तारा रोडच्या नाक्यावरील "बडी मस्जिद" इथे आणण्यात आला. "ए टू झेड" अशी आद्याक्षरे पहिली तर अमिताभ ते झीनत असे सर्वांच्या सर्व अभिनेते, अभिनेत्री, संगीतकार, गीतकार, वादक मंडळी त्या "अंतिम यात्रेत" सामील झाली होती. पण त्या गर्दीतले कुणीही "त्या" सर्व "सेलिब्रिटीज" कडे ढुंकूनही पाहत नव्हतं. एकच उदासी त्या माहौलमध्ये होती. जुम्मा (शुक्रवार)! दुपारचा "नमाज" होताच "जनाज-ए-नमाज" पढला गेला.. आणि अचानक धुवांधार पावसाला सुरुवात

झाली. निसर्गही जणू आक्रंदत होता. अश्रू ढाळत होता. गर्दीत.. एरवी कधीच न रडणारे आज आपल्या आवडत्या गायकाच्या अकाली जाण्याने व्यथित होत अश्रू ढाळत होते. डोळे पुसण्याची गरजच नव्हती, ते अश्रू पावसाच्या धारांमध्ये सामावून जात होते! त्या "कबरीत" माती लोटताना गर्दीने.. जो हंबरडा फोडला, त्याचा "प्रतिध्वनी" आजची माझ्या काळजाचा थरकाप उडवतो! निळ्या आकाशाकडे हताशपणे पहावं तर ढगातून रफीसाहेबांचा हसरा चेहरा आजही धूसरपणे दिसत राहतो.. आणि ओठांवर असतं "दिल का सूना साज, तराना धुंडेगा.. मुझको मेरे बाद जमाना धुंडेगा.."!!

लेखक : © डॉ. अनंत पावसकर
(ज्येष्ठ पत्रकार व सिनेसंगीत अभ्यासक)

♥

'तुम मुझे यूँ.. :'मोहम्मद रफी' ♥ © डॉ.अनंत पावसकर

"मोहम्मद रफी" यांचे "अल्बम्स"









Best of Rare Gems
Mohd. Rafi

THE GOLDEN VOICE
Mohd. Rafi

Best Of
Mohammad Rafi
Hit Songs
52 MILLION+ VIEWS

BEST OF
Mohd. Rafi

Mohd. Rafi
Magic Golden Hits

Top 10
Mohammed Rafi
Songs


100
YEARS OF
MOHAMMED
RAFI

HD
2 MILLION+ VIEWS
Mohammed Rafi
POPULAR SONGS
JUKEBOX


Mohammed Rafi
60s
SOULFUL HITS


shemaroo
DARD
MOHD. RAFI
TOP SENTIMENTAL HITS
JUKEBOX
HD

MOHD.RAFI TOP 15
Sentimental | Sad Songs
PART 1
shemaroo


Best Of
Mohd.Rafi
Jukebox
5
MILLION+
VIEWS
Bollywood
Classics

LEGENDS
TOGETHER
Mohd. Rafi &
Kishore Kumar
DUETS


101 YEARS OF
MOHAMMED RAFI
सुरों के सरताज
SUPERHIT SONGS
JUKEBOX

JUKEBOX
Lata
&
Rafi
Romantic Songs

shemaroo
Magical Duets
Mohd. Rafi
& Asha Bhosle
PART-1
Jukebox

TOGETHER FOREVER
Johnny Walker
&
Mohd. Rafi
JUKEBOX
shemaroo
HD

CARVAAN CLASSIC
RADIO SHOW
20 TIMES
MOHD RAFI
SANG FOR
DEV ANAND


shemaroo
TOGETHER FOREVER
Mohd. Rafi
& Shammi
Kapoor
Jukebox
HD

Mohd. Rafi Sings for
Actor Kishorkumar


Top 21 Hits
Mohammed Rafi
Sings For Dilip Kumar

Mohd. Rafi
Sings for
Dharmendra

Mohd. Rafi
Sings for
Mehmood

shemaroo
TOGETHER FOREVER
Rajendra Kumar
&
Mohd. Rafi
JUKEBOX
HD

shemaroo
- TOGETHER FOREVER -
O.P. NAYYAR
& MOHD.RAFI
JUKEBOX
HD

shemaroo
TOGETHER FOREVER
SHANKAR
JAIKISHAN
&
MOHD.RAFI
Jukebox
HD


shemaroo
Naushad
&
Mohd. Rafi
TOGETHER FOREVER
Jukebox
HD

100
SONGS OF
MOHAMMED RAFI
LAXMIKANT-PYARELAL

shemaroo
TOGETHER FOREVER
Ravi
&
Mohd. Rafi
Jukebox

shemaroo
TOGETHER FOREVER
Joy
Mukherjee
& Mohd.Rafi
JUKEBOX
HD

Mohd. Rafi sings for
Vishwajeet
GOLD
VIDEO PRESENTS


Mohd. Rafi sings for
Shashi Kapoor

मराठी
मुखपान पुस्तके दिशा उपक्रम प्रतिसाद कट्टा आमही कोण संपर्क सभासदत्व देणगी
ई साहित्य प्रतिष्ठान®
Marathi ebooks, Marathi books
सुस्वागतम
मराठी मित्रमैत्रिणींनो!
ई पुस्तके ! मस्त पुस्तके !! इझी पुस्तके!
छान मराठी पुस्तके ! उत्तम मराठी ई बुक्स !!
Marathi Books , Marathi ebook epustak
मराठी ईपुस्तक, quality epub Books, best Marathi PDF,
Marathi eBook publisher, Marathi Novels, Marathi Story,
Marathi History, Marathi Music, Marathi book publishing,
Marathi epub, Maratha History, Marathi Comedy,
Marathi Drama books, Marathi Sant sahity, Religious
books, Story books, ई बुक मराठी, Marathi epub, epubs
मराठी ई पुस्तक प्रकाशक, मराठी पुस्तक
सभासद व्हा! स्वतःचे पुस्तक प्रकाशित करा !
संगीत
ई-ये मराठीचिये नगरी
जो जे वाचील तो ते लाहो
पुस्तकाच्या कव्हरवर फक्त एक क्लिक आणि पुस्तक उघडेल.
आता सर्व पुस्तकांच्या छापिल आवृत्ती उपलब्ध आहेत. आपली मागणी नोंदवा WhatsApp- 9987737237
https://chat.whatsapp.com/KybNQeSmpaF46C47GyeXQl?mode=ac_t
esahity free ebooks_46
आपण या ग्रुपमध्ये सामील झाल्यावर वर्षाला १०० ते २०० मराठी ई पुस्तकं विनामूल्य नियमित प्राप्त होतील.